मंगळवार, 20 सप्टेंबर 2022
किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक - 49
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

●MARATHI ●DAINIK ●AURANGABAD (MAHARASHTRA) ●TUESDAY 20 SEPTEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-49 ●TITLE CODE : MAHMAR51117 ●PAGE-12 ●PRICE-5

## महत्त्वाची बातमी

### संभाजीराजेंच्या संघटनेचा पहिल्याच निवडणुकीत विजय

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** राज्यातील ग्रामपंचायत निवडणुकांचे निकाल हाती येत आहेत. माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांच्या स्वराज्य संघटनेने यावेळी महाराष्ट्रातून राजकारणात एन्ट्री केली. त्यानंतर पहिल्याच निवडणुकीत स्वराज्य संघटनेने खातं उघडलं आहे. नाशिकमधील गणेशगाव येथील महिला उमेदवार सरपंच पदावर निवडून आल्या आहेत.

संभाजीराजेंच्या स्वराज्य संघटनेला निवडणुकांच्या इतिहासातील पहिला विजय हा नाशिकच्या गणेश गावातून मिळाला आहे. स्वराज्य संघटनेच्या उमेदवार रूपाली ठमके विजयी झाल्या आहेत. संभाजीराजे छत्रपती यांनी नुकतीच स्वराज्य संघटना स्थापन केली होती. नाशिक तालुक्यातील अनेक गावांमध्ये स्वराज्य संघटना पुरस्कृत उमेदवार दाखल करण्यात आलेले होते. गणेशगाव येथील ग्रामपंचायत निवडणुकीत रूपाली ठमके स्वराज्य संघटना पुरस्कृत उमेदवार होत्या. गणेशगाव येथे सरपंच पदासाठी रूपाली ठमके यांना तिकीट देण्यात आले होते.

# पत्राचाळ घोटाळ्यातील मास्टरमाईंड संजय राऊतच

## आरोपपत्रात ईडीचा दावा; राऊत यांचा जेलमधील मुक्काम वाढला




आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : शिवसेना नेते आणि खासदार संजय राऊत यांच्या अडचणीत आता आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. ईडीने दाखल केलेल्या आरोपपत्रात संजय राऊत हेच पत्राचाळ घोटाळ्यातील मास्टरमाईंड असल्याचा दावा करण्यात आला आहे. ईडीने आपल्या आरोपपत्रात खुलासा केला आहे की, पत्राचाळ प्रकरणात राकेश वाधवान, सारंग वाधवान आणि प्रवीण राऊत यांनी संगनमताने मनी लॉंड्रिंग केली आहे.**



ईडीने खुलासा केला आहे की, प्रवीण राऊत हे संजय राऊत यांचे विश्वासू होते म्हणून त्यांना गुरु आशिष कंपनीत आणण्यात आले. प्रवीण राऊत हे संजय राऊत यांचे जवळचे मित्र असल्याने या प्रकल्पात तेही गुंतले होते. प्रवीण राऊत यांच्याकडे अधिकार होते की, ते कोणत्याही महत्त्वाच्या कागदपत्रावर स्वाक्षरी करू शकता होते. त्यांना म्हाडाशी वाटाघाटी करण्याचे आणि सर्व सरकारी, निमशासकीय, वैधानिक आणि स्थानिक प्राधिकरणांशी संपर्क साधण्याचे काम सोपविण्यात आले होते.

संजय राऊत यांच्याशी जवळीक असल्यामुळे प्रवीण राऊत यांनी म्हाडाच्या बहुतांश सरकारी अधिकाऱ्यांशी विविध फायदे मिळवण्यासाठी स्वतः संपर्क साधला. नंतर एफएसआय बिल्डरला विकला. याप्रकरणात राकेश वाधवान, प्रवीण राऊत आणि संजय राऊत यांचे आपसात संगनमत होते. गुरु आशिष कन्स्ट्रक्शन कंपनीत प्रवीण राऊत यांचा 25 टक्के हिस्सा होता. तरीही यात प्रवीण राऊत हे फक्त एक चेहरा होते. हे सर्व काही संजय राऊत यांच्या नियंत्रणाखाली झाले असल्याचे ईडीने आपल्या आरोपपत्रात म्हटले आहे.

प्रवीण राऊत यांनी आपल्या जबाबात दावा केला आहे की, पत्राचाळचा पुनर्विकास प्रकल्प 740 कोटी रुपयांचा असून त्यांना 25 टक्के शेअर्स असल्याने सुमारे 180 कोटी रुपये मिळाले असते. यातच संजय राऊत यांना या गुन्ह्यातून मोठ्या प्रमाणात पैसा मिळाल्याचा अंदाज ईडीने व्यक्त केला आहे. या संपूर्ण घोटाळ्यात संजय राऊत यांनी अनेक मालमत्ता विकत घेतल्याचे तपासात समोर आले आहे, याशिवाय हा पैसा त्यांच्या वैयक्तिक कामासाठी वापरण्यात आला. संजय राऊत यांना मिळालेल्या पैशाचा (रोख) स्त्रोत प्रवीण राऊत असून त्यांना हे पैसे गुरु आशिष कन्स्ट्रक्शनकडून मिळाले आहेत. सुरुवातीला हा प्रकल्प केवळ 13.18 एकरचा होता आणि संजय राऊत आल्यानंतर हा प्रकल्प 47 एकरचा झाल्याचेही तपासात समोर आले असल्याचे ईडीने आपल्या आरोपत्रात म्हटले आहे. दरम्यान, याप्रकरणी संजय राऊत यांचा तुरुंगातील मुक्काम आणखी वाढला आहे. संजय राऊत यांची न्यायालयीन कोठडी चौदा दिवसांनी वाढली आहे. संजय राऊत यांना 4 ऑक्टोबरपर्यंत कोठडी सुनावण्यात आली.

# महागाई अजूनही नियंत्रणाबाहेर जाण्याची शक्यता

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची (RBI) तीन दिवसीय पतधोरण आढावा बैठक 28 सप्टेंबर ते 30 सप्टेंबर दरम्यान पार पडणार आहे. ऑगस्ट महिन्यात किरकोळ महागाई दर पुन्हा एकदा 7 टक्क्यांच्या पातळीवर पोहचल्याने आरबीआय रेपो दरात पुन्हा वाढ करण्याची शक्यता आहे. आंतरराष्ट्रीय वित्तीय फर्म मॉर्गन स्टॅनली यांनी आरबीआय व्याज दरात वाढ करण्याची शक्यता असल्याचे म्हटले आहे. आरबीआय रेपो दरात 0.50 टक्क्यांची वाढ करू शकते.

मॉर्गन स्टॅनली यांनी आपल्या अहवालात म्हटले की, रेपो दरात 35 बेसिस पॉईंटची वाढ होऊ शकते असा याआधी आमचा अंदाज होता. मात्र, महागाई दरात होत असलेली वाढ आणि जगभरातील केंद्रीय बँका घेत असलेल्या भूमिका पाहता आरबीआय रेपो दरात 0.50 टक्क्यांनी वाढ करू शकते, असे मॉर्गन स्टॅनलीने म्हटले. याआधी रिझर्व्ह बँकेने रेपो दरात 1.40 टक्क्यांची वाढ केली आहे. पहिल्यांदा मे महिन्यात 40 बेसिस पॉईंट, दुसऱ्यांदा जून महिन्यात 50 बेसिस पॉईंट आणि ऑगस्ट महिन्यात 0.50 टक्क्यांची वाढ रेपो दरात केली होती. त्यानंतर आता पुन्हा एकदा रेपो दरात वाढ होण्याची शक्यता आहे.



मॉर्गन स्टॅनली नुसार, खाद्यान्नांच्या महागाईमुळे सप्टेंबर महिन्यातील किरकोळ महागाई दर हा 7.1 टक्के ते 7.4 टक्के इतका राहू शकतो. पुढील वर्षी जानेवारी-फेब्रुवारी पर्यंत महागाई दरात घट होऊ शकते. जानेवारी-फेब्रुवारी 2023 या कालावधीत किरकोळ महागाई दर हा 6 टक्क्यांच्या आसपास राहू शकतो असा अंदाज मॉर्गन स्टॅनलीने व्यक्त केला आहे. खाद्यान्नाच्या महागाईत वाढ होत असल्याने महागाई दरात तेजी दिसून येत आहे. कमोडिटीच्या किंमती वाढ आणि डॉलरच्या तुलनेते रुपया कमकुवत होत असल्याने आयात महाग होण्याचा धोका आहे. त्यामुळे किरकोळ महागाई दरात वाढ होऊ शकते.

रेपो रेट म्हणजे ज्या दराने बँका रिझर्व बँकेकडून पैसे घेते तो दर. रेपो रेट वाढणं म्हणजे बँकांना रिझर्व बँकेकडून मिळणाऱ्या कर्जदरात वाढ होणं, तर रेपो रेट कमी होणं म्हणजे बँकेला स्वस्तात पैसे मिळणं. म्हणजेच आरबीआयने रेपो रेट वाढवला तर पर्यायाने सर्व बँकांना ग्राहकांना द्यावयाची कर्जाचे दरही वाढवावे लागतात. तर कमी झाल्याने व्याज दर कमी होतो. रिव्हर्स रेपो रेट म्हणजे रेपो रेटच्या अगदी उलट संकल्पना आहे. बँका रिझर्व बँकेकडून कर्जरूपी पैसा घेतात, तसाच रिझर्व बँकही या वेगवेगळ्या बँकाकडून कर्जरूपाने पैसे घेत असते. तेव्हा त्यासाठी जो दर आकारला जातो, त्याला रिव्हर्स रेपो रेट म्हणतात.



# दहावी, बारावी परीक्षेच्या तारखा ठरल्या

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्य मंडळातर्फे दहावी आणि बारावीच्या परीक्षेचे संभाव्य वेळापत्रक जाहीर करण्यात आले. त्यानुसार बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते २० मार्च या कालावधीत, तर दहावीची परीक्षा २ मार्च ते २५ मार्च या कालावधीत घेतली जाणार आहे. हे संभाव्य वेळापत्रक बोर्डाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे. शाळा, कनिष्ठ महाविद्यालय आणि विद्यार्थी यांना अभ्यासक्रमाचे नियोजन करण्याच्या हेतूने फेब्रुवारी मार्च 2023 च्या लेखी परीक्षेचे संभाव्य वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.

# शिक्षक -पदवीधर आमदारांच्याच जिल्ह्यात शिक्षण व्यवस्था कोलमडली

## प्रथम सत्र परीक्षा जवळ आल्या तरी जिल्ह्यातील 1 ते 8 वर्गातील 55 हजारांच्यावर पुस्तकांची कमतरता

आधुनिक केसरी न्यूज

सचिन कोरडे

उस्मानाबाद : जिल्ह्यातील शाळा सुरू होऊन तीन महिने उलटले तरीही शाळेतील अनेक मुलांना नवीन पाठ्य पुस्तकेच मिळालेलेच नाहीत. सरकारच्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार सर्वच अभ्यासक्रमामध्ये बदल होत आहेत.मात्र उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये बालभारतीचा पुस्तकांचा पुरवठा कमी असल्यामुळे विद्यार्थ्यांना जुन्या पाठ्यपुस्तकावर नविनअभ्यासक्रमाचे धडे गिरवावे लागत आहेत.

पाठ्यपुस्तकांच्या बाबतीत एखाद्या इयत्तेची अथवा एखाद्या विषयाच्या पुस्तकांची कमतरता ठीक होती. कारण दोन वर्षे कोरोना काळात गेले छपाई मशीन बंद असतील त्यात काय तांत्रिक त्रुटी आल्याकारणाने एखाद्या विषयाच्या पुस्तकात विलंब झाला म्हणता आले असते. पण इथे इयत्ता पहिलीपासून ते आठवीपर्यंत विविध विषयांच्या पुस्तकांचा तुटवडा आहे. शिक्षणाचे प्रथम सत्र वर्ष सरत आले तरीही आपल्या मुलांना अजून पुस्तकच नाहीत. त्यामुळे शिक्षक आमदारांच्या जिल्ह्यातीलच पाठ्यपुस्तकासाठी अवस्था बिकट असल्याने पालकांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.

एखाद्या आमदाराने सध्य परिस्थिती पाहून शिक्षकांबद्दल वक्तव्य केले असता, महाराष्ट्रातील बहुतांश शिक्षकांनी त्वरित मोर्चे काढले, माफी मागणे तर आंदोलने करू म्हणून धमकी वजा इशारे देत आंदोलने केली.





मात्र आज तीन महिने उलटून गेले तरीही अजून पाठ्यपुस्तकच उपलब्ध नाही. जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी व विनाअनुदानित शाळेच्या शिक्षकांसाठी त्वरित एकवटून शिक्षक संघटनेने ज्या पद्धतीने जिल्ह्यामध्ये मोर्चा काढून आंदोलन केले. आम्ही देशाचे भवितव्य घडवतो आमचं भवितव्य अंधारात म्हणणारे शिक्षक वृंद कदाचित चिमुकल्यांच्या भविष्याबाबतीत विसर पडलेले दिसून येत होते. अशा आंदोलन करणाऱ्या काळजीवाहू शिक्षक संघटनेला ज्या वर्गात आपण विद्यार्थ्यांचे भविष्य घडवतो त्या वर्गात पाठ्यपुस्तकांची कमतरता आहे. याबाबत आपण सर्व शिक्षकांनी एकत्र येऊन आंदोलन करू असे कधीच वाटले नाही का? याबाबत पालकांना नवलच वाटत आहे.

एका आमदाराच्या वक्तव्याबाबत संभाजीनगर मध्ये सर्व शिक्षक संघटनेला एक करत शिक्षक आमदार व पदवीधर आमदार यांनी जोरदार निदर्शने केली. पण जिल्हा आपली मायभूमी आहे. अशा दोन्ही आमदारांच्या तालुक्यात सर्वात जास्त पाठ्यपुस्तकांची कमतरता आहे. याबाबत एकही अधिकारी एकही संघटना एकही शिक्षक आमदार यांना स्वतः पुढे विद्यार्थ्यांच्या भविष्याच देणे घेणे नाही.

असंच चित्र उस्मानाबाद जिल्ह्यात पाहायला मिळत आहे.ज्या तालुक्यांमध्ये शिक्षक आमदार लहानाचे मोठे झाले त्याच उस्मानाबाद तालुक्यात 1ते8 वर्गासाठी 1 लाख 89हजार 645एवढ्या पुस्तकांची मागणी असता त्यापैकी 1 लाख76 हजार534 एवढीच पाठ्यपुस्तक या तालुक्याला मिळाली उर्वरित 13 हजार 111 पाठ्यपुस्तक एक महिन्यावर दिवाळी आली तरी अजून मिळालीच नाहीत. यासाठी शिक्षक आमदार आंदोलन करणार का? असाच सवाल त्यांच्याच तालुक्यामधील पालक वर्ग विचारत आहे. तर शिक्षक संघटनेच्या आंदोलनामध्ये आक्रमक असणारे उमरग्याचे पदवीधर आमदार यांच्या तालुक्यात तर 8 हजारावर पाठ्यपुस्तकांसाठी शाळा व विद्यार्थी प्रतीक्षा करतं आहेत. याची जाणीव आमच्या तालुक्यातील पदवीधर आमदारांना होईल का! अशीच उमरग्यातील समस्त पालकांची मागणी जोर धरू लागली आहे. उर्वरित तुळजापूर,लोहारा, कळंब,भूम परंडा व वाशी यांची परिस्थिती वेगळी नाही. जिल्ह्यात आरोग्यमंत्र्यांचा आढावा बैठका, जनता दरबार यावर चांगलाच जोर आहे. पण आपल्या जिल्ह्यातील चिमुकल्यांच्या पाठ्यपुस्तकासाठी लक्ष घालण्याची गरज भासत आहे. कारण जिल्ह्याच्या विकासासाठी आढावा बैठकावर बैठका घेणाऱ्या आरोग्यमंत्र्यांच्याच मतदारसंघात 12 हजार 313 एवढी पाठ्यपुस्तक येणे बाकी आहेत. यासाठी एखादी आढावा बैठक लावाच असच वक्तव्य मतदारसंघातील पालक वर्गांमधून होत आहे.

तर तुळजापूर मतदारसंघाचे शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचा विमा मिळवून देण्यासाठी नावलौकिक असणारे धडाकेबाज आमदार यांच्या तुळजापूर तालुक्यात 7 हजार610 एवढी कमी असणारी पाठ्यपुस्तक जसं पीक विम्यासाठी न्यायालयीन लढा उभा करतात, असाच एखादा लढा पुस्तकासाठी उभा करनार का? खासदार साहेबांनी जनतेसाठी सतत कार्यरत असणारा मोबाईल एक फोन या चिमुकल्यांच्या पाठ्यपुस्तकासाठी लावला तर 55हजार696 पाठ्यपुस्तकांचा प्रश्न मिटेल का? शेतकऱ्यांना आम्हीच विमा मिळून दिला यात चढवडीने भाषण करण्यात व्यस्त असणारे खासदार आमदार जिल्ह्याला पाठ्यपुस्तक मिळून मीच दिले याबाबत कोण श्रेय घेतात व आमच्या शाळेला पुस्तक मिळाल्याशिवाय आम्ही शाळा उघडणार नाही असेही कुठली शिक्षक संघटना आंदोलन करण्यास उभे राहते का? हे पाहण्यास जिल्हातील समस्त पालकवर्ग वाट पाहत आहे. "चिमुकल्यांना शिक्षणाचे बाळकडू पाजत असताना शाळेत पाठ्यपुस्तकांचीच कमतरता असेल तर या लहानग्यांना लहानपणीच राजकारणाच बाळकडूपाजून तुमच्या मागे कार्यकर्ता म्हणून पाठवायचं का." असाच सवाल समस्त जिल्ह्यामधून घुमत आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

## जंगलतोडीचे भीषण दुष्परिणाम



त्यांचा वेग तेथे कमी होऊन ते खाली जमिनीवर पडत असत. तेथे त्यांचा वेग शून्य होई, झाडाखालची माती, गवत यात ते जिरून जात. झाडांमुळे त्यांच्या भोवतालची माती मुळांभोवती पकड धरून असायची. जेव्हा पाऊस खूपच जास्त असे तेव्हाच फक्त तेथून ते खालच्या भागाकडे नदी किंवा प्रवाह बनून वाहत जात. पण जंगले नष्ट होऊ लागली. पावसाचे पाणी झाडे नसलेल्या उघड्याबोडक्या जमिनीवर वेगाने कोसळू लागले. आता या पाण्याचा खालच्या भागाकडे वाहण्याचा वेग प्रचंड वाढला. हे पाणी नुसते वाहत नव्हते तर जाताना डोंगर उतारावरील माती आपल्यासोबत घेऊन जात होते. यामुळे आधीच उघड्या झालेल्या डोंगरांचे मातीचे, खडकांचे संरक्षक आवरण नष्ट होत होते. केवळ एक हेक्टर परिसरातली साठ ते सत्तर टन माती किंवा गाळ नद्या आपल्यासोबत वाहून नेत होत्या. यावरून नद्यांचा वेग आणि त्यामुळे होणारी जमिनीची धूप केवढी प्रचंड होती याचा अंदाज आपल्याला येऊ शकेल.

१९७० मध्ये उत्तराखंडला अलकनंदेच्या पुराने जबर तडाखा हाणला. नदीचे पूर, दरडी कोसळणे, गाळ वाहून येणे, जमिनीची धूप होणे या गोष्टी तशा स्थानिकांना नवीन नव्हत्या. पण १९७० च्या पुराने या सगळ्या लोकांची भीतीने अक्षरशः पाचावर धारण बसली. या पुराचे रूप अत्यंत विनाशकारी आणि भयचकित करणारे होते. या पुराच्या राक्षसी प्रवाहात कित्येक पूल वाहून गेले, शेकडो बसेस वाहून गेल्या, शेकडो एकर शेतजमिनीतली पिके नष्ट झाली, शेतातील माती वाहून गेली, गुरेढोरे वाहून गेली, माणसे बेघर झाली. शेकडो लोकांचा मृत्यू झाला.

### एक लढा असाही (भाग-2)

( अशाच प्रकारची दुर्घटना २०१३ मध्ये केदारनाथ परिसरात घडली. या परिसरातील गावे, घरे वाहून गेली. तर महाराष्ट्रातील माळीण गावातही २०१४ मध्ये अशी दुर्घटना घडली. यात दरड कोसळून त्याखाली संपूर्ण गाव गाडले गेले होते. ) यातूनच पुढे माणसे कशी एकत्र आली आणि या नैसर्गिक ( खरे तर मानवनिर्मित ) संकटाशी कशा प्रकारे लढा द्यायला त्यांनी सुरुवात केली हे पुढील भागात पाहू या.




## आनंदी पहाट

## आपले भ्रमच संभ्रम निर्माण करतात

आधुनिक केसरी

आपण वर्तमानांत आपले जीवन जगत असताना खरे तर सद्यःस्थितीचा आणि नजीकच्या भविष्यकाळाचा विचार करणे महत्वाचे, गरजेचे आणि म्हणूनच आवश्यक असते. आपण वर्तमानातील जीवन जगताना प्राप्त परिस्थितीचा आनंद लुटण्याच्या ऐवजी भूतकाळाचे गोडवे गात बसतो. मी असे केले होते, तसे केले होते, माझ्यासारखे कोणी काही करूच शकले नव्हते, माझ्याकडे एवढा पैसा होता, मी सर्वांत अधिक व्यवसाय केला होता वगैरे वगैरे.... ह्या सर्वच घटना भूतकाळातल्या असतात, त्याचेच आपण सदोदित कौतुक करत रहात असतो. भूतकाळाचे भूतच जणू काही आपल्या मनाचा ताबा घेऊन सर्वत्र टेंभा मिरवत असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

वर्तमानातल्या "मी" चा त्यामुळेच आपल्याला विसर पडलेला असतो. मागील काळात, गत आयुष्यात, भूतकाळात मी कधी, कसा, कोण, कोठे आणि काय होतो, ह्यापेक्षा सद्यःस्थितीत, वर्तमानकाळात, आज मी कसा, कोण, कोठे आणि काय आहे आणि ते सुद्धा का? कोणत्या कारणानं? ह्याचा प्रकर्षाने आणि प्राधान्याने, सातत्याने आणि साकल्याने अभ्यासपूर्वक विचार करत राहणे गरजेचे असते.

आपल्या आयुष्यात अथवा इतरत्र काय घडले आहे, हे आपल्याला माहिती असतेच किंवा ते कालांतराने माहिती होतेच. कालची, भूतकाळातील माहिती आपल्या सर्वांनाच उपलब्ध होत असते. वर्तमानात राहून भूतकाळातल्या अनुभवांबरोबर सतत राहणे हे नेहमीच उपयोगाचे ठरते असे नाही. प्राप्त परिस्थितीत काहीवेळा उपलब्ध झालेल्या अनेक चांगल्या संधी आपण गमावू शकतो. ह्याचे नुसते ज्ञान असून चालत नाही तर त्या संधीचे सोने करण्याचे भान आपल्याला असणे आवश्यक असते. अनेकदा आपल्या गत आयुष्यातील अनेक बाबींची सांगड, बरोबरी, तुलना आपण प्राप्त आणि सद्यःस्थितीशी करत असतो. काहीवेळा नकारात्मक विचार आपल्या अंतर्मनांत थैमान घालायला लागतात आणि भ्रमातले आपण संभ्रमांत जखडून राहतो.



आधुनिक केसरी

## केशव माधवा | तुझे ठायी ||

तुझा तूचि जाण | देव अंतरीचा ||
भाव तू मनीचा | शुद्ध ठेव ||१||

घडावा सदैव | संतसमागम ||
वात्सल्याचे धाम | पंढरीत ||२||

आत्म्याच्या अंगणी | ज्ञानाचे चिंतन ||
नामाचे भजन | रात्रंदिन ||३||

लागो तुज छंद | आत्मचिंतनाचा ||
संवाद संतांचा | कानी पडो ||४||

परम सुखाचे | मुळ जाण जीवा ||
केशव माधवा | तुझे ठायी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरुपण"

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**जगदम्ब नमस्तुभ्यं नित्यं नित्यं नमो नमः।**
**त्वमेव केवलं सत्या कृत्याऽसि त्वं नमो नमः ।।**
जगदंबिके, तुला नमस्कार असो. नित्य नित्य नमस्कार असो. तूच केवळ सत्य आहेस. तू कृत्या आहेस. तुला नमस्कार असो.
**जगदम्ब नमस्तुभ्यं सुरवराभिवन्दिते।**
**दुष्टदैत्यविनाशिन्यै नमस्तुभ्यं नमो नमः ।।**
सुरवरांनी वन्दिलेल्या जगदंबिके, तुला नमस्कार असो. दुष्टदैत्यांचा विनाश करणारे तुला त्रिवार नमस्कार असो.
**जगदम्ब नमस्तुभ्यं विशालाक्षि नमो नमः।**
**चारुरूपे नमस्तुभ्यं विश्वरूपे नमो नमः।।**
जगदंबिके, तुला नमस्कार असो. विशालाक्षी, तुला नमस्कार असो. चारुरूपे, तुला नमस्कार असो. विश्वरूपे तुला नमस्कार असो.
**जगदम्ब नमस्तुभ्यमजये विजये नमः।**
**अयोध्ये च नमस्तुभ्यं सिद्धिदात्रि नमो नमः ।।१०।।**
जगदंबिके, तुला नमस्कार असो. विजये तुला नमस्कार असो. जिच्या समवेत युद्ध करण्याची कुणाची शक्ती नाही, (कारण तू स्वतःच शक्तीरूपिणी आहेस.) अशा तुला नमस्कार असो. सिद्धी देणारे तुला नमस्कार असो.

## संवाद ज्ञानोबा तुकयाचा

आधुनिक केसरी

समस्त ज्ञानासी असशी तूच पाया
तूच ज्ञानराया, तुका म्हणे
केले तुवां खुले ज्ञानाचे भांडार
हर्ष अपरंपार होई लोका.
थोर तुझा महिमा
काय मी वर्णावा
निःशब्द हा तुका ज्ञानदेवा.
दावियली लोकां ऐसी शब्दकळा
फुलविला मळा अमृताचा
सोसुनी प्रहार लोकनिंदेचे
बोल अमृताचे प्रसवले.
गीतेचा तो अर्थ
सांगे ज्ञानेश्वरी
दिव्य ती वैखरी अमृताची.
म्हणे ज्ञानराजा ऐक ऐक रे तुकया
माझिया सखया भूलोकीच्या
रचियली तुवां अभंगाची गाथा
भाविक तो माथा टेकतसे.
रूढी परंपरा, दंभ अभिमान
व्यर्थ ते लक्षण भाविकांचे
दावियला तुवां भक्तिमार्ग लोका
धन्य माझा तुका बोले ज्ञानदेव.
काळावरी तरले तुझे ते अभंग
धरूनिया संग श्रीहरीचा
असे मी जरी पाया
तू झालासी कळस
आली देवळास
अलौकिक शोभा.
तुका म्हणे ज्ञानराजा
आता वंदितो चरण
न करी वर्णन
आणिक माझे.
साक्षी तया दोघा
इंद्रायणी पार
सोन्याचा पिंपळ डुलतसे.
धन्य इंद्रायणी, धन्य चंद्रभागा
कृपा पांडुरंगा झाली तुझी.

आधुनिक केसरी

# परमेश्वर सर्वत्र आहे

एकदा एक तरुण मुलगी एका संतमहात्म्याकडे गेली आणि त्यांना आर्जवानं विनंती करत म्हणाली, "माझे बाबा गेले अनेक महिने आजारी असल्यानं त्यांना स्वतःहून काहीही हालचाल तर करता येत नाहीच, परंतु ते रुग्णशय्येला खिळून आहेत. तुम्ही एकदा येऊन त्यांना भेटाल का?"
"का नाही...? नक्कीच येईन मी..." करुणासागर असलेले संत उद्गारले. त्या घरी भेट दिली असता, त्या संतांना असं दिसलं की रुग्णशय्येला खिळून असलेल्या त्या वृद्ध व्यक्तीच्या पलंगाशेजारी एक रिकामी खुर्चीही ठेवलेली आहे. "तुम्ही कदाचित् मी येण्याचीच वाट पहात होता असं दिसतंय?" त्या खुर्चीकडे पहात संत म्हणाले.
"नाही...नाही...तसं नाहीये." वृद्ध व्यक्ती उद्गारली.
त्यानंतर ती वृद्ध व्यक्ती विनंतीच्या स्वरात म्हणाली, "हे महाराज! कृपया खोलीचं दार लावून घ्याल का?"
संतांनी दार बंद केल्यावर, वृद्ध व्यक्ती पुन्हा बोलू लागली, "खरं सांगायचं तर, या क्षणापर्यंत, मी या रिकाम्या खुर्चीचं रहस्य कोणापुढेही उघड केलेलं नाही...अगदी माझ्या लाडक्या मुलीलाही ते ठाऊक नाहीये. तुम्हाला म्हणून सांगतो, संपूर्ण आयुष्यभर, प्रार्थना कशी करतात ते मला कधीच समजलं नाही. नित्यनियमानं देवळात जाण्याचा परिपाठ कटाक्षानं पाळूनही मला प्रार्थनेचा खरा अर्थ कधी समजला नाही."
"परंतु चारएक वर्षांपूर्वी माझा एक मित्र मला भेटायला आला असता, त्यानं मला सांगितलं की मी माझी प्रार्थना थेट परमेश्वरालाच सांगू शकतो. त्या मित्रानं मला सांगितलं की आपल्यासमोर एक रिकामी



खुर्ची ठेवायची आणि तिथे प्रत्यक्ष परमेश्वरच स्थानापन्न झालेला आहे असं समजून समोर कोणी असताना आपण जसं त्या व्यक्तीशी संवाद साधतो ना तसाच संवाद खुर्चीत बसलेल्या परमेश्वराशी साधायचा. परमेश्वर आपली प्रत्येक प्रार्थना अगदी काळजीपूर्वकपणे ऐकत असतो. माझ्या मित्राचा हा सल्ला मी जसा जसा न चुकता पाळू लागलो तसा तसा तो मला अधिकच आवडू लागला."
"त्यानंतर आता रोज दोन तास मी परमेश्वराशी गप्पा मारत असतो. मात्र, माझा हा संवाद माझ्या लेकीच्या दृष्टीला पडू नये याची मी दक्षताही घेत असतो, कारण जर एका रिकाम्या खुर्चीकडे पाहून मी गप्पा मारतोय असं तिनं पाहिलं तर तिचा गैरसमज होईल की आजारामुळे माझ्या डोक्यावर परिणाम झालाय."
त्या वृद्ध व्यक्तीचे हे शब्द ऐकून संतमहात्मे हेलावून गेले. प्रेम आणि भावनांचं मिश्रण असणारे अश्रू त्यांच्या डोळ्यातून वाहू लागले. आपल्या आश्रमात परतण्यापूर्वी संतांनी त्या वृद्ध व्यक्तीच्या माथ्यावर आपला वरदहस्त ठेवला आणि म्हणाले, "तुम्ही सर्वोच्च पातळीची भक्ती करत आहात. तुमच्या या साध्याभोळ्या भक्तीमधे खंड पडू देऊ नका."
पाच दिवसांनी, त्या वृद्ध व्यक्तीची मुलगी संतांना भेटण्यासाठी त्यांच्या आश्रमात गेली आणि वंदन करुन तिने त्यांना सांगितलं, "त्या दिवशी तुमच्याशी भेट झाल्यानं माझ्या बाबांना अत्यानंद झाला...पण काल सकाळी ते देवाघरी गेले."
"त्या दिवशी मी कामासाठी निघण्यापूर्वी त्यांनी मला हाक मारली आणि मोठ्या प्रेमानं त्यांनी माझ्या कपाळावर ओठ टेकवले. यापूर्वी कधीही न दिसलेल्या एक प्रकारच्या आत्मिक आनंदानं आणि शांततेनं त्यांचा चेहरा न्हाऊन गेला होता. परंतु त्यांच्या डोळ्यात मात्र अश्रू होते. संध्याकाळी मी जेंव्हा घरी परतले, तेंव्हा एका अद्भुत दृश्यानं मी थक्क झाले – गेले काही महिने ज्यांना मदतीशिवाय स्वतःला कोणतीही हालचाल करता येत नव्हती ते माझे बाबा पलंगात उठून बसलेले होते, परंतु त्यांचं मस्तक मात्र त्यांच्या पलंगाशेजारी ठेवलेल्या खुर्चीवर होतं...जणूकाही त्यांनी कोणाच्यातरी मांडीवर डोकं ठेवलंय. नेहमीप्रमाणे खुर्ची रिकामीच होती. जगाचा निरोप घेताना बाबांनी खुर्चीवर डोकं का बरं ठेवलेलं होतं याचं कृपया उत्तर मला द्याल का?"
त्या वृद्ध व्यक्तीच्या मृत्युची वार्ता ऐकून संतमहात्मा ढसाढसा रडू लागले आणि आपले दोन्ही हात आकाशाकडे उंचावून ते कळवळून परमेश्वराची प्रार्थना करु लागले, "हे प्रभू! जेंव्हा या जगाचा निरोप घेण्याचा माझा क्षण येईल ना तेंव्हा मीदेखील या मुलीच्या बाबांसारखाच निरोप घ्यावा एवढी कृपा माझ्यावर करा."
प्रभूच्या मांडीवर मस्तक ठेऊन जगाचा निरोप घ्यायचा असेल तर प्रत्येक क्षणी 'तो' सर्वत्र आहे हा विश्वास आधी निर्माण करता यायला हवा. असं ज्याला जमलं त्याला परमेश्वराचं प्रेम प्राप्त करणं अशक्य नाहीच आणि मानवीजन्माची हीच तर इतिकर्तव्यता आहे.
अनायासेन मरणं विनादैन्येन जीवनं ।
देहि मे कृपया कृष्ण त्वयि भक्तिं अचन्चलं ॥
हिंदू धर्मात असलेली ही प्रार्थना अत्यंत गहन आहे. या प्रार्थनेद्वारे भक्तानं प्रभूकडे तीन इच्छा मागितल्या आहेतः-
१. कोणत्याही शारिरीक वेदनांविना मृत्यु २. प्राथमिक आवश्यकतांची पूर्तता होईल असं साधं आयुष्य (महाल माड्या नकोत नाथा, माथ्यावर दे छाया) ३. आणि कोणत्याही प्रसंगी डगमगणार नाही अशी प्रभूचरणांवर अढळ श्रद्धा.

# मध्यमवर्गीयांनीच सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक संस्था उभ्या केल्या : सासणे

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** मराठवाड्याला निजामाच्या जोखडातून सोडवण्यासाठी उभारलेल्या लढ्यात मध्यमवर्गीयांचा मोठा वाटा होता, मध्यमवर्गीय समाजानेच विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक संस्था उभ्या केल्या. उच्चभ्रू समाजाला अशा संस्थांची उभारणी करण्याची फार चिंता नसताना मध्यमवर्गीय समूहाने हे रचनात्मक कार्य हाती घेतले मात्र अलीकडे सामाजिक पर्यावरणाशी आपले देणेघेणे नाही असे या मध्यमवर्गीयांना वाटल्याने या समूहात बधिर अवस्था निर्माण झाली, असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष भारत सासणे यांनी केले. मराठवाडा साहित्य परिषदेच्या 79 व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले-पाटील होते. या कार्यक्रमाचे आयोजन मसाप बीड शाखेतर्फे




करण्यात आले.सासणे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून वर्धापनदिनाचे उद्‌घाटन करण्यात आले. आरंभी सासणे यांचे ठाले-पाटील यांनी सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले तर बीड शाखेचे अध्यक्ष डॉ. सतीश साळुंके यांनी प्राचार्य ठाले पाटील यांचे सन्मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन बीड शाखेच्या वतीने स्वागत केले.

आपल्या भाषणात सासणे पुढे म्हणाले की, स्वातंत्र्यपूर्व काळात साहित्यिक हे स्वातंत्र्यसैनिक होते. एका बाजूला परकीयांशी संघर्ष व दुसऱ्या बाजूला स्वकियांवर संस्कार अशी दुहेरी भूमिका त्यांनी निभावली. मसाप ही सामाजिक बांधिलकी मानणारी संस्था आहे. तिची विशिष्ट भूमिका आहे. तमाम साहित्यिक मसापकडे अपेक्षेने पाहत आहेत. मध्यमवर्गीय समूहात आलेली बधिरता नष्ट करण्यासाठी साहित्याने योगदान द्यायला हवे असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मसापचे कार्यवाह डॉ. दादा गोरे यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात दादा गोरे यांनी मसापचा साहित्यिक आणि सांस्कृतिक इतिहास विस्तृतपणे मांडला. प्राचार्य कौतिकराव ठाले-पाटील यांनी अध्यक्षीय समारोप केला. आपल्या अध्यक्षीय समारोपात ठाले पाटील म्हणाले की, देवगिरीवर परकियांच्या आक्रमणापासून ते 1948 पर्यंतच्या तब्ल 654 वर्ष परकीय सत्तेला न जुमानता मराठवाड्याने आपली मराठी भाषा टिकली आणि जगवली. राजकीय क्रांतीच्या हेतूने स्थापना झालेली मसाप ही देशातील एकमेव साहित्यिक संस्था असल्याचे सांगून ते म्हणाले की, मराठवाडा मुक्तीसंग्राम आणि मसापचा अतूट संबंध आहे. स्वातंत्र्यलढ्याला सहकार्य करण्याच्या हेतूने मसापची स्थापना झाली आहे हे त्यांनी आवर्जून सांगितलं. कार्यक्रमात परिवर्तन प्रतिष्ठान बीडचे बालनाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत विविध सात पुरस्कार घेऊन प्रथम आलेल्या 'प्रायश्चित्त' या नाटकातील बालकलावंतांना भारत सासणे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आली.

कार्यक्रमाच्या वेळी व्यासपीठावर परिषदेचे उपाध्यक्ष प्रा. किरण सगर, कोषाध्यक्ष कुंडलिक अतकरे, प्राचार्य डॉ. दीपाताई क्षीरसागर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मसाप बीड शाखेचे कार्यवाह प्राचार्य जे.एम. पैठणे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. रेखा ढेरे- घोलप यांनी केले. कार्यक्रमानंतर जिल्ह्यातील कवींचे कविसंमेलन संपन्न झाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य पैठणे, दीपक सरवदे, मंगेश रोटे, अण्णासाहेब गडदे, प्रशांत मुळे, प्रा. डॉ. रेखा ढेरे, सुधा साळुंके, अशोक घोलप, प्रथमेश खडकीकर यांनी परिश्रम घेतले.

# स्व. मोहनलालजी बियाणी स्मृती व्याख्यानमाला विद्यार्थ्यांनी ताणतणावाचे व्यवस्थापन कसे करावे ?

## डॉ. प्रकाश आंबेकर जालन्यात गुंफणार दुसरे पुष्प

आधुनिक केसरी न्यूज



**जालना** : दैनिक मराठवाडा साथीचे संस्थापक, संपादक स्व. मोहनलालजी बियाणी स्मृती व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प जालना येथे मानसोपचार तज्ज्ञ डॉ. प्रकाश आंबेकर गुंफणार आहेत.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, जेईएस महाविद्यालय आणि मानस फाउंडेशन, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी 'ताणतणावाचे व्यवस्थापन' या विषयावर डॉ. प्रकाश अंबेकर यांचे व्याख्यान 22 सप्टेंबर रोजी सकाळी 11 वाजता जेईएस महाविद्यालयात होणार आहे. कोरोनानंतरच्या काळात नवी आव्हाने विद्यार्थ्यांसमोर उभी राहिली असून अभ्यास व पालकांच्या अपेक्षांचा ताण विद्यार्थ्यांना सहन करावा लागत आहे. यातून काहींना नैराश्य येऊन आत्महत्येचा प्रयत्न विद्यार्थी करत आहेत. यातून मार्ग कसा काढावा



याविषयी डॉ. प्रकाश आंबेकर मार्गदर्शन करणार आहेत. या व्याख्यानास उपस्थितीचे आवाहन महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे औरंगाबाद जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे यांच्यासह कार्यकारिणीने केले आहे. प्रवेश सर्वांसाठी खुला आहे.




# शैक्षणिक कार्य गुणात्मक व दर्जात्मक होण्यासाठी संवाद कौशल्य वाढवा

## शिक्षण उपसंचालक डॉ. शिवलिंग पटवे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** मानवी जीवनाचा सर्वांगीण विकास हा त्याच्या शिक्षणावरच अवलंबून असतो. तो जितका शिक्षणामध्ये ज्ञान अर्जित करतो, तो तितकाच यशाच्या शिखरावर जाऊन बसतो. शिक्षणाची दिशा ही माणसाच्या संपुर्ण विकासासाठी आणि त्याच्या मुलभूत अधिकारांसाठी महत्वाची असते. देशाला आर्थिक महासत्ता आणि प्रभावी राष्ट्र बनवण्यात युवक महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात त्यामुळेच शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गुणात्मक व दर्जात्मक शिक्षण देण्याबरोबरच त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी संवाद कौशल्य वाढविणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन अमरावती विभागाचे शिक्षण उपसंचालक डॉ.शिवलिंग पटवे यांनी केले. ते अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघ, शाखा पुसद व जि.प. शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी पतसंस्था, यांच्या संयुक्त विद्यमाने गजानन महाराज संस्थानच्या सभागृहात रविवारी (ता. १९) आयोजित शिक्षण परिषदेच्या उद् घाटन प्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अ.भा. शिक्षक संघाचे राज्याध्यक्ष देविदास बस्वदे हे होते.

प्रमुख अतिथी म्हणून शिक्षक आमदार ॲड. किरण सरनाईक, सौ .मोहिनी नाईक,अ.भा.प्रा.शिक्षक संघाचे राज्य उपाध्यक्ष दिगंबर जगताप, गटशिक्षणाधिकारी संजय कांबळे, लोणावळा येथील मनशक्ती केंद्राचे अजीत पाफाळे,पुणे येथील नितीन राजनेकर, जिल्हाध्यक्ष प्रदीप खांडाळकर, मावळते अध्यक्ष रमाकांत मोहरकर, सारंग भाटुरकर, श्रीमती कचरे आदी मान्यवर उपस्थित होते.



# पोरगाव ढोरकिन रस्ता बनलाय मृत्यूचा सापळा

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर नीळ**

**कचनेर :** पैठण तालुक्यात असलेल्या पोरगांव व ढोरकिन या गावांना जोडणारा रस्ता अक्षरशः मृत्यूचा सापळा बनलाय या रस्त्यावर अपघात होण्याचा धोका सुद्धा वाढलाय. या रस्त्याचे अक्षरशः चाळणी झाले आहे. रस्त्यावर मोठे मोठे खड्डे पडलेले असून त्या खड्ड्यात पाणी तुबते. वाहनधारकांना या रस्त्यावरून जाताना रस्त्यावर खड्डे आहे की खड्ड्यातून रस्ता हा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही. सदरील रस्त्यावरून मोठ्या प्रमाणावर वाहतूक होत असते. धार्मिकदृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या कचनेर व पैठण दोन धार्मिक स्थळांना जोडणारा हा दुवा आहे. जैन भाविक प्रवास करत असतात. या रस्त्यामुळे त्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागतो. या रस्त्यावरून विद्यार्थ्यांना सुद्धा शाळेत यावे लागते. सदरील रस्ता चांगला करावा अशी मागणी नागरिक प्रशासनाकडे करत आहेत.



# अदानी यांची नवी सिमेंट कंपनी

आधुनिक केसरी

अदानी समूहाने अंबुजा सिमेंट्स आणि एसीसी या कंपन्यांच्या संपादनाची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर कंपनीच्या अध्यक्षपदी विराजमान झालेल्या गौतम अदानी यांनी आज पहिल्यांदाच कंपनीतील समभागधारक आणि गुंतवणूकदारांशी संवाद साधला. शुक्रवारी एकूण ६.५ अब्ज डॉलरच्या (सुमारे ५२ हजार कोटी रुपये) मोबदल्यात कंपनीचे संपादन केल्याचे अदानी समुहाकडून जाहीर करण्यात आले होते. आजचा दिवस ऐतिहासिक आहे. ऐतिहासिक यासाठी की, एका झटक्यात आम्ही आता देशातील दुसऱ्या क्रमांकाचे सिमेंट उत्पादक झालो आहोत, असं म्हणत गौतम अदानींने आपल्या भाषणाला सुरुवात केली. हा दिवस ऐतिहासिक यासाठी देखील की, हा संपादन व्यवहार भारतातील पायाभूत सुविधा आणि साहित्य क्षेत्रातील आतापर्यंतचा सर्वात मोठा देशांतर्गत पार पाडलेला ताबा व विलीनीकरण व्यवहार आहे. हा व्यवहार चार महिन्यांच्या विक्रमी वेळेत पूर्णत्वासही नेण्यात आला, असंही गौतम अदानी यांनी म्हटलं. भारत आधुनिक जगात पाहिल्या गेलेल्या आजवरच्या सर्वात मोठ्या आर्थिक मुसंडीच्या उंबरठ्यावर असताना या व्यवसायात आमचा प्रवेश होत असल्याचं समाधान आहे, असंही त्यांनी आपल्या भाषणात म्हटले. आपल्याला अनेकदा सिमेंट क्षेत्रातील गुंतवणुकीबद्दल अनेकजण विचारतात असं सांगत गौतम अदानींनी या क्षेत्रामध्ये पाऊल ठेवण्यामागील कारण सांगितलं. मला अनेकदा प्रश्न विचारला जातो – सिमेंट का? तर याच निमित्ताने या व्यवसायात प्रवेशामागील तर्काबद्दल सांगायचं झालं तर भारताच्या विकासपथावर आमचा अढळ विश्वास आहे. २०५० पर्यंत भारत २५ ते ३० ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था असेल असं आम्हाला वाटतं. यासंदर्भातील आकडेवारी तुम्हाला ठाऊक असेलच तरीही भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सिमेंट उत्पादक देश आहे, हे मी येथे नमूद करी इच्छितो, असं गौतम अदानी म्हणाले. आपल्या येथे सिमेंटचा दरडोई वापर चीनच्या १,६०० किलोच्या तुलनेत फक्त २५० किलो आहे. म्हणजे वाढीसाठी जवळजवळ सात पटीने वाव असल्याचं यातून निरदर्शनास येतं. शिवाय, सरकारी स्तरावर अनेक कार्यक्रमांना गती मिळाल्याने, सिमेंटच्या मागणीतील दीर्घकालीन सरासरी वाढ जीडीपीच्या १.२ पट ते १.५ पट असणे अपेक्षित आहे. प्रत्यक्षात आमचा अंदाज या संख्येच्या दुप्पट वाढ होण्याचा आहे, असंही गौतम अदानींनी स्पष्ट केलं. पायाभूत सुविधा आणि गृहनिर्माण क्षेत्रातील ट्रिलियन-डॉलरच्या गुंतवणुकीसह आपल्या देशाच्या विकासाचे नवीन गोष्ट उलगडत आहे. अशावेळी सिमेंट हा आपल्या पायाभूत सुविधा व्यवसायासाठी, विशेषत: अदानी समूहाचा बंदरे आणि दळणवळण तसेच लॉजिस्टिक व्यवसाय, हरित ऊर्जा व्यवसाय आणि विकसित होत असलेल्या ई-कॉमर्स व्यासपीठ या सर्वांसाठी एक समर्पक जोड व्यवसाय ठरेल, असा विश्वास गौतम अदानींनी व्यक्त केला. या व्यवसायामध्ये उतरल्याने आम्हाला महत्त्वपूर्ण स्पर्धात्मक फायदा देण्याबरोबरच या माध्यमातून आम्हाला अतुलनीय प्रमाणात लाभ मिळवण्याची शक्यता आङे. माझा असाही विश्वास आहे की, अदानी समूहासारखा परिचालन कार्यक्षमतेइतकी सक्षमता असणारे आजच्याघडीला दुसरे कोणीही नाही आणि त्यामुळेच मागील वर्षांमध्ये आम्ही केलेल्या अनेक अधिग्रहणांमधून आम्हाला निश्चितच फायदा होईल. परिणामी, आम्ही लक्षणीय अंतराने विस्ताराने देशातील सर्वात फायदेशीर सिमेंट उत्पादक बनण्याची अपेक्षा आहे, असंही गौतम अदानी म्हणाले. सध्याच्या ७० दशलक्ष टन क्षमतेवरून पुढील पाच वर्षांत १४० दशलक्ष टनांपर्यंत जाईल असा आमचा अंदाज आहे.

# धर्मांतरणाचा धोका



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

आधुनिक केसरी

**नुकतीच नागपूरच्या डॉक्टर आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर बिशप पी सी सिंह याला अटक झालेली आहे. त्याच्या घरून दीड कोटी रुपये रोख व इतर लाखो रुपयांचे परकीय चलन आढळून आलेले आहे. बिशप पी सी सिंह याच्याकडे त्याच्या नावावरचे 48 विविध खात्यांचे पासबुक सुद्धा सापडलेले आहे. यावरून पीसी सिंह याची अनेक बँकेमध्ये खाती आहे व त्यांच्याकडे बराच मुद्देमाल जमा आहे हे यावरून लक्षात येते. त्यांच्या द्वारा संचालित विविध संस्थांचा पैसा हा धार्मिक कार्यासाठी वापरल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. हा पैसा धर्मांतरणासाठी वापरण्यात आला तर नाही ना याबद्दलही चौकशी सुरू आहे. लवकरच सत्य समोर येईल. परंतु त्यातून काही प्रश्न निर्माण होतात.**





पीसी सिंह तर बिशप आहेत म्हणजे ख्रिश्चन धर्माचे ते एक मोठे नेते आहेत. त्यांच्या घरून दीड करोड रुपये रोख सापडावेत एवढे पैसे त्यांच्याकडे कुठून आले? त्यांच्या नावावर 48 खाते कसे काय? अनेक वाहन आणि प्लॉट सुद्धा त्यांच्या नावावर आहे. एवढी मोठी माया त्यांनी कशी व कधी जमविली? असे कोणते स्त्रोत आहेत ज्यामुळे त्यांच्याकडे इतका पैसा येत गेला व या पैशाचा उपयोग करून त्यांनी भोळ्या भाबड्या लोकांना धर्मांतरित केले असेल का? रामायणावरील एका कथेमध्ये प्रभू रामचंद्र व लक्ष्मण हे पंपा नावाच्या एका सरोवराच्या काठी उभे असतात. त्या सरोवरामध्ये अनेक बगळे विहार करीत असतात. त्यातील डोळे मिटून पाण्यावर स्थिर असलेल्या एका बगळ्या कडे पाहून प्रभू रामचंद्र लक्ष्मणाला म्हणतात की हे लक्ष्मण, बघ! हा बगळा किती पांढराशुभ्र आहे व या पाण्यावर निश्चल असा एखाद्या साधू सारखाच बसलेला आहे. त्यांचे ते वाक्य ऐकून पाण्यातील एक मासोळी बाहेर येते व त्यांना म्हणते की प्रभू हा पांढराशुभ्र बगळा दिसतो तसा नाही आहे. हा पांढराशुभ्र व साधू सारखा दिसणारा बगळा एकेक करीत माझ्या बांधवांना खात आहे व आमच्या कुळाला निश्कूल बनवीत आहे. त्याचप्रमाणे गेल्या दोनशे वर्षांपासून भारतामध्ये ईस्ट इंडिया कंपनी येण्याच्या आधीपासून सुद्धा चर्च भारतात आले व त्यांनी येथे आपले धर्मांतरणाचे कार्य सुरू केले. बगळा जसा पांढराशुभ्र दिसतो आहे तसाच पोशाख यांनीही केलेला आहे. बगळा जसे शांतपणे एक एक मासोळी खात आहे त्याच पद्धतीने हे लोक सुद्धा धर्मांतरणाच्या द्वारा एकेक हिंदू धर्मांतरित करीत हिंदू समाजाला निश्कूल करण्याचे कार्य करीत आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर डॉक्टर राजेंद्र प्रसाद जे भारताचे पहिले राष्ट्रपती होते ते नागालँड येथील एका कार्यक्रमात गेले होते. तेथील चर्चने सुरू केलेल्या एका शाळेचे व दवाखान्याचे उद्घाटन होते. त्यामध्ये बोलताना डॉक्टर राजेंद्र प्रसाद म्हणाले की आपण लोक इतक्या दुरून म्हणजे सातासमुद्रापलीकडून आमच्या देशात येऊन अशा पद्धतीचे सेवा कार्य करीत आहात ही फारच चांगली गोष्ट आहे. फक्त एवढीच काळजी घेतली पाहिजे की या सेवाकार्याच्या आडून येथे धर्मांतरण होणार नाही. त्या कार्यक्रमात राष्ट्रपतींच्या समोर आपले भाषण करताना तेथील बिशप म्हणाले होते की एवढ्या दुरून सातासमुद्रापलीकडून आम्ही येथे सेवेसाठी नाही तर धर्मप्रचारासाठी व आपला धर्म वाढविण्यासाठीच आलेलो आहोत. अगदी राष्ट्रपतीच्या समोर सुद्धा या बिशप महोदयांनी अगदी स्वच्छ व सत्य गोष्ट सांगितलेली होती. भारतामध्ये आजही अनेक दुर्गम भागांमध्ये असेल किंवा शहरी भागांमध्ये असेल धर्मांतरणाचे कार्य सुरू असते. हे धर्मांतरण कधी शिलाई मशीन वाटून केले जाते तर कधी घरावर टाकण्यासाठी टिन देऊन, कधी शिळ्यामेंढ्या देऊन केले जाते तर कधी विहिरीचे पाणी काढण्यासाठी एखादी मोटर देऊन.

आतापर्यंत काँग्रेसच्या राज्यात विविध सरकारी योजना सुद्धा तहसीलदार, पटवारी, ग्रामसेवक यांच्या संगनमताने हे लोक बळकावायचे व तुला डिझेल पंप पाहिजे असेल तर ख्रिश्चन व्हावे लागेल असे सांगून समोरच्याला ख्रिश्चन करायचे. कोणी अंथरुणाला खिळला असेल तर त्याला सुद्धा त्याच्यावर उपचार करून ख्रिश्चन बनविले जायचे. ज्यांना लोक मदर( ?) टेरेसा म्हणतात ह्या बाई सुद्धा कलकत्ता शहरातील फूटपाथवर थंडीमध्ये झोपलेल्या लोकांना जागे करून त्यांना चर्चमध्ये नेऊन एवढ्या थंडीतही त्यांना थंड पाण्यात स्नान करून बाप्तिस्मा घ्यायला लावायच्या व त्यांना ख्रिश्चन करायच्या. अगदी तापाने फणफणलेले रोगी, त्यांना सुद्धा थंड पाण्यात बाप्तिस्मा हा घ्यावाच लागायचा. म्हणजेच काय तर सेवा देणाऱ्याच्या बाजूला धर्मांतरण करणारा हा तयारच असतो. या हाताने सेवा घ्या व या हाताने धर्म स्वीकारा अशा पद्धतीचे हे कार्य असते .लोकांना जमा करून त्यांचे फोटो काढून ते विदेशात पाठविले जातात व विदेशात काम करणाऱ्या वेगवेगळ्या एनजीओ कडून मोठमोठ्या देणग्या मिळवतात. आम्ही भारतात येशूचा संदेश पसरवित आहोत त्यासाठी आम्हाला देणगी द्या. ह्या लोकांना येशू सांगण्यासाठी आम्हाला देणगी द्या. अशा पद्धतीची याचना या गोरगरीब लोकांचे फोटो पाठवून केलेली असते. काही लोकांना वाटेल की केवळ दुर्गम, जंगली भागातच हे सर्व कार्य चालते परंतु अगदी शहरी भागात सुद्धा हे कार्य सुरू असते. मध्य प्रदेशातील बिशपच्या घरी सापडलेली ही सर्व माया कोणकोणत्या देशातून आलेली आहे हे येणाऱ्या काळात स्पष्ट होईलच. परंतु या पैशाच्या जोरावर किती लोक धर्मांतरीत झाले हे पाहणे सुद्धा आवश्यक ठरेल.

देश स्वतंत्र झाल्यावर मध्य प्रदेशात चालणाऱ्या या धर्मांतरणाच्या कार्यावर एक अहवाल सादर करण्यासाठी नियोगी कमिशन बसविण्यात आले होते. व त्यांनी सुद्धा आपल्या अहवालामध्ये मध्य प्रदेशातल्या सुदूर भागात, ग्रामीण भागात कशा पद्धतीने धर्मांतरणाचे कार्य सुरू आहे हे सांगितले होते. गरीब लोकांना कशा शिक्षणाच्या ,आरोग्याच्या, विविध वस्तूंच्या सोयी पुरवून त्यांना धर्मांतरित केले जाते हे सुद्धा सांगितलेले होते. इतक्या विज्ञानाच्या व प्रगतीच्या युगामध्ये एखाद्याचा धर्म बदलविण्याची आवश्यकता काय असा प्रश्न आपल्या लोकांना पडू शकतो. परंतु धर्मांतरण हे राष्ट्रांतरण आहे हे आपण ओळखले पाहिजे. स्वामी विवेकानंद म्हणायचे की एखादा हिंदू परधर्मात गेला असता हिंदूंची संख्या एक ने कमी होते असे नाही तर हिंदू धर्माचा एक शत्रू सुद्धा वाढतो त्यामुळे धर्मांतरण हे बंदच व्हायला पाहिजे. त्यावर लगाम लावल्या गेली पाहिजे. कायद्याने जे व्हायचे ते होईलच परंतु समाजाने सुद्धा जागरूक राहणे आवश्यक आहे. आमच्यातील कोणीही बंधू शिक्षणाच्या, आरोग्याच्या किंवा कोणत्या वस्तूंच्या साठी परधर्मात जाऊ नये यासाठी हिंदू समाजाने सुद्धा जागरूक राहणे आवश्यक आहे. अन्यथा एकेकाळी अस्तित्वात असणारा डायनासोर सुद्धा महाकाय व प्रचंड होता परंतु तो सुद्धा नष्ट झाला. आज त्याचे अवशेष केवळ बघायला मिळतात. हिंदू समाज अतिप्रचंड व महाकाय जरी असला तरी सुद्धा अशा पद्धतीने एक दिवस तो सुद्धा नामशेष होऊ शकतो हा धर्मांतरणाचा धोका आहे हे सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे.

# शालेय स्पर्धा : विद्यार्थ्यांच्या भविष्याला वाव देणारे व्यासपीठ



भरत कोळी
बॉक्सिंग प्रशिक्षक, धुळे

आधुनिक केसरी

**व्यक्तीच्या सर्वांगीण विकास हा विशिष्ट अशा वयोगटातचं होत असतो, मूलभूत हालचालींचा व मूलभूत कारक कौशल्याचा विकास हा प्राथमिक, माध्यमिक शालेय स्तरावर होतो तर उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन स्तरावर व्यक्तीमहत्वाचा पाया हा मजबूत होत भविष्यात ते देशांच्या विकासात फार मोठी भूमिका बजावत असतात म्हणून शालेय स्तरावर त्यांच्या सर्वांगीण विकासाचा पाया मजबूत असणं हे अति आवश्यक आहे, त्याचबरोबर क्रीडा कौशल्य विकासाचा पाया मजबूत होणं ही ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेच्या दृष्टीने महत्वाचं असल्याने शालेय स्पर्धा म्हणजे विद्यार्थ्यांच्या क्रीडा भविष्याला वाव देणारे व्यासपीठ आहे हे लक्षात घेऊन शासनाने शालेय स्तरावरील क्रीडा स्पर्धेकडे पाठ फिरवणे हे मूर्खपणा आहे असं मला वाटतं.**

खरंतर एखाद्या इमारतीचा पाया मजबूत असेल तरचं ती इमारत मोठं ओझं पेलू शकते अन्यथा ढासाळते अशीच काहीशी परिस्थिती शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांच्या बाबतींत होते जर त्याचा शालेय स्तरावरचं शारीरिक व मानसिक विकासाबरोबरचं जर क्रीडा कौशल्याचा पाया मजबूत असेल तर ऑलिम्पिक सारख्या मोठ्या क्रीडा स्पर्धेत वाटचाल ही यशाकडे नेणारी असते अशा विविध बाजु लक्षात घेता शालेय स्तरावरील क्रीडा स्पर्धेला उशीर न करता लवकरात-लवकर घेऊन विद्यार्थ्यांच्या क्रीडा गुणांना न्याय द्यावा ही शासन दरबारी विनंती.

महामूर्ख कोरोना प्रादुर्भावामुळे दोन वर्षांपासुन न झालेल्या शालेय क्रीडा स्पर्धा ह्या शालेय विद्यार्थ्यांचे मानसिक खच्चीकरण करण्यास जवाबदार ठरू लागल्या आहेत, मोठया स्तरावर ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा,राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा,आशियाई, जागतिक क्रीडा स्पर्धा, प्रीमिअर लीग व इतर क्रीडा स्पर्धा कोरोना प्रादुर्भाव ओसरल्यानंतर झाल्या मग शालेय क्रीडा स्पर्धेला विलंब का होऊ शकला असा प्रश्न पालकांकडून उपस्थित होत आहे,खरंतर संघटनांच्या राजकारणामुळे व कोरोनामुळे शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांचे क्रीडा भविष्य हे दोन वर्षापासून धुळ खात पडलेलं आहे त्या क्रीडा भविष्याला शालेय क्रीडा स्पर्धेची प्रचंड गरज आज आहे त्यामुळे संघटनांनी एकत्र येऊन विद्यार्थ्यांचे क्रीडा भविष्याला वाचविण्याची जवाबदारी घ्यावी, जेव्हा ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत पदक येत नाही तेंव्हा बऱ्याचदा खेळाडूं, प्रशिक्षकांवर वर टीका होते पण खऱ्या अर्थाने विचार केला तर याला जास्त संघटनात्मक प्रशासन व शासन जवाबदार असते हे आजच्या शालेय क्रीडा व्यवस्थेकडून समोर येत आहे याचा सरळ असा अर्थ पालक वर्ग घेत असल्याने अतिशय सकारात्मक दृष्टिकोन ठेवून शालेय क्रीडा



स्पर्धेचे नियोजन करुन लवकरात-लवकर शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांच्या क्रीडा भविष्याला वाचविण्याची गरज आहे, ही मुलं शालेय क्रीडा स्पर्धेतूनचं क्रीडा कौशल्याने,क्रीडा गुणांने,खेळाडूवृत्तीने, विविध सांघिक रणनिती,क्रीडाडावपेचांनी सक्षम होत जागतिक,राष्ट्रीय व ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेसारख्या अनेक क्रीडा कुंभमेळात बलशाली होतात त्यामुळे शालेय क्रीडा स्पर्धेकडे दुर्लक्ष होणं हे २०२८ च्या ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेसाठी धोक्याची घंटा असु शकते त्यामुळे संघटनांनी एकत्र येऊन शालेय क्रीडा स्पर्धेविषयी योग्य तो पाऊल उचलून शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा संस्कृतीची ज्योत पेटती ठेवा,शालेय स्पर्धा न झाल्यास १९ वर्ष वयोगटातील मुलांना क्रीडागुण, नोकरीतील ५ टक्के क्रीडा आरक्षण अशा विविध लाभा पासून वंचित राहू लागू शकते म्हणून शालेय क्रीडा स्पर्धा ह्या लवकर घेऊन त्यांना न्याय द्यावा, शालेय क्रीडा स्पर्धा म्हणजे विद्यार्थ्यांच्या क्रीडा भविष्याला वाव देणारे व्यासपीठ आहे तर ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेचा पाया मजबुत करणारे एक महत्वकांक्षी असा शालेय उपक्रम आहे त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची योजना लक्षात घेता शालेय क्रीडा स्पर्धा यावर्षी होणं हे अति आवश्यक आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# "ती"च्या मनाची निर्मळता अनुभवण्याचा कस्तुरीयोग

आधुनिक केसरी

मुंबई येथील सुप्रसिध्द युवा साहित्यिक कस्तुरी देवरुखकर हिचा हा पहिला ललितलेखसंग्रह. यापूर्वी 'स्वप्नसखा' आणि 'शब्दकस्तुरीचा चांदणचुरा' या दोन वाचकप्रिय काव्यसंग्रहाच्या रूपाने तिची आपल्याशी भेट झाली आहेच. कवयित्री म्हणून जरी साहित्य क्षेत्रात तिचे पदार्पण झाले असले तरी केवळ काव्याच्या परिघात अडकून न पडता अन्य साहित्यप्रकार ती तितक्याच ताकदीने हाताळू लागली आहे. या संग्रहातून वाचकांना त्याची प्रचिती येईलच. या संग्रहातील सर्व लेख हे सोलापूरातील एका नामवंत दैनिकात साप्ताहिक स्तंभलेखनाच्या रूपात प्रसिद्ध झाले आहेत. बऱ्याचदा वृत्तपत्रीय स्तंभलेखनाचे विषय तात्कालिक आणि म्हणूनच अल्पजीवी असतात. पण या पुस्तकासाठी निवडलेल्या लेखांचे विषय हे सार्वकालिक आहेत. कधीच शिळे होणारे नाहीत.

'बाल रंगभूमी', 'अश्रू', 'निसर्ग राजा, 'ऋतू प्रेमाचा', 'पितृपक्ष' अशी काही शीर्षके पाहिली तरी हे लक्षात येईल.

बालरंगभूमी या पहिल्याच लेखात तिने नोंदवलेली पुढील निरीक्षणे दखल घ्यावी अशीच आहेत. ती म्हणते,

काही वर्षांपूर्वी बाल रंगभूमी हे केवळ करमणुकीचे साधन होते. बालनाट्ये सादर करणाऱ्या संस्था संख्येने कमी होत्या पण त्यांची कलेवरील निष्ठा वादातीत होती. ओल्या मातीला योग्य आकार देऊन बालकांचा सर्वांगीण विकास साधण्याची तळमळ त्या काळच्या नाट्यनिर्मात्यात होती. आता मुलांना सादरीकरण करण्यासाठी अनेक दारे मोकळी झाली आहेत. तरीही मुळापासून कष्ट घेण्याची कोणाची तयारी नाही. रिॲलिटी शोजच्या माध्यमातून मिळणारी अकाली अन् अवाजवी प्रसिद्धी मुलांचा सर्वांगीण विकास होण्यास मारक आहे. ही परिस्थिती बदलावी ही लेखिकेची उत्कट भावना आहे.

' अश्रू ' हा आसवांची महती सांगणारा लेखही असाच काहीसा वेगळा आहे. इथे लेखिकेने अश्रूंची सुंदर व्याख्याच केलीय,

'मनात उठलेल्या विचारांच्या, विवंचनांच्या असंख्य लाटा आणि त्यायोगे होणारी घुसमट यांचा विसर्ग होण्यासाठी निसर्गाने दिलेले जलरूपी वरदान म्हणजे अश्रू' या निसर्गाच्या देणागिला कमजोरी न समजता कोणत्याही अपयशामुळे वा दुःखामुळे ढळलेला मानसिक तोल सांभाळण्यासाठो आसवांचा शस्त्राप्रमाणे वापर करावा आणि मनातील मळभ दूर झाले की नव्या दमाने आव्हानांचा सामना करण्यासाठी सिद्ध व्हावे असा छानसा संदेश देऊन काही काव्यपंक्तीद्वारे लेखाचा शेवट होतो.

अश्रू म्हणजे संवेदना,
काळजातली वेदना..
अश्रू म्हणजे भावनांची ओल,
जाणती जखमेतली व्यथा खोल..

लेखिकेचा जन्म आणि जडणघडण मुंबईत झाली असली तरी कोकणातल्या आपल्या गावाशी असलेली तिची नाळ कधीच तुटली नाही. 'गाव माझं न्यारं' या लेखाची सुरुवातच मस्त कवितेने झालीय.

'रम्य वाटे मजला,गावामधली पहाट
हिरवळीच्या पाटावर,पक्ष्यांचा किलबिलाट
कौलारू या घरावरती, किरणांचा थाट
प्राजक्त,चाफ्याची अंगणामध्ये बरसात..'

हे रमणीय गाव, दिवसाच्या प्रत्येक प्रहरी बदलणारा निसर्ग, सणावाराला ओसंडून वाहणारा गावकऱ्यांचा उत्साह हे सारे नोंदवताना तिच्या शब्दकळेला असा काही बहर येतो की बस..

'इथली सकाळ, दुपार, संध्याकाळ पाहताना वाटते, लग्न मंडपात नटून बसलेली नववधू ज्याप्रमाणे दिवसभरात तीनदा पेहराव बदलते. त्याप्रमाणे या तीनही प्रहरात सृष्टीचा वेगळाच थाट दृष्टीस पडतो अन् पाठवणीचा कार्यक्रम सुरु झाल्यावर नवरीला हुंदका आवरेनासा होतो, अगदी तशीच जिवाला कातरणारी नीरव, शांत कातरवेळ येते' हे वाचल्यावर आपणच जणू त्या गावातील ही कातरवेळ अनुभवतो आहोत अशीच भावना उत्पन्न होते.

शाळेला सुट्टी पडली की लेखिका थेट गावाकडेच धाव घ्यायची आणि त्या जीवनाशी पूर्णपणे समरस होऊन जायची त्यामुळे तिथल्या संस्कृतीचे, जीवनशैलीचे बारकावे टिपणे शक्य झाले.

कोकणात शिमगा हा खूप मोठा आणि महत्त्वाचा सण. उर्वरीत महाराष्ट्रात दोन दिवस चालणारा हा सण कोकणात तब्बल पाच दिवस किती उत्साहाने साजरा होतो याचे बहारदार वर्णन या लेखात केलंय ते मुळातूनच वाचायला हवे.

"शहरातील झगमगाट पाहून थकलेल्या डोळ्यांना शांत नीज येण्यासाठी, जीवघेण्या स्पर्धेत पायपीट करून झाल्यानंतर विश्रांती घेण्यासाठी, खचलेल्या मनाला तणावमुक्त करून नव्या उमेदीची उभारी देण्यासाठी, एक तरी गाव असावं..गावातल्या टुमदार घरट्यात मायेचं गोकुळ वसावं..!" ही लेखिकेची इच्छा वाचून खरंच 'तथास्तु' असेच म्हणावेसे वाटते.

'निसर्गराजा' ही तर लेखिकेच्या मर्मबंधातील ठेवत जणू. त्यामुळे या लेखात तिच्या शब्दकळेचे सौंदर्य सर्वांगाने फुलून आलेले वाटते . लेखाची सुरुवातच पाहा ना,

'गंध ओल्या ऋतुची किनार..
भरल्या आभाळी दाटली...
शांत निजलेली एक कळी..
हिरवळीच्या मिठीत भेटली'

वसंतापासून शिशिरापर्यंतचे सहा ऋतू म्हणजे विविधांगी सौंदर्याची उधळण करणारी निसर्गाची सहा अपत्ये आहेत अशी सुरेख कल्पना इथे मांडली आहे.


संपन्न शब्दकळेचा आणखी एक नमुना पाहा,

"पानांच्या ओलसर ओंजळीतून निसटलेले दंवाचे कोवळे थेंब काळजावर झेलावेसे वाटतात. तर कधी अळवाच्या गुळगुळीत पानावर घसरगुंडी करत मौजेने पहुडणारा पाण्याचा इवलासा थेंब व्हावस वाटतं. निसर्गाचे दुसरे नावच आहे आयुष्य."

निसर्गावर भरभरून प्रेम करणाऱ्या या कवयित्रीला सागराचे आकर्षण तर विलक्षण आहे. सागराची गाज म्हणजे हृदयाची तार छेडणारे संगीतच आहे अशीच तिची भावना आहे. दिवसाच्या कोणत्याही प्रहरी या संगीताचा आस्वाद घ्यायला ती तत्पर असते. मनाचा ठाव घेणाऱ्या या काही ओळी तर पाहा,

"ऐन दुपारच्या वेळी, अथांग पसरलेल्या सागर किनारी गेल्यावर नीरव शांततेत पसरलेला उष्ण दमट वाऱ्याचा गंध श्वासात रूतून बसतो. अशावेळी समुद्रकिनारी दिमाखात उभे राहून साक्षात सूर्याच्या आव्हानाला प्रतिसाद देणाऱ्या डौलदार नारळाच्या झाडाखाली झावळ्यांच्या आडोशाला बसून एकटक समुद्राकडे पाहत राहावस वाटतं कारण त्या उसळणाऱ्या प्रत्येक लाटेसोबत आपल्या विचारांचे मंथन होत असते. भावनांचा डोह घुसळून निघतो. हळूहळू सूर्याची प्रखर तेजस्वी किरणे मंद होतात. मग सोनेरी संधीप्रकाशाच्या साक्षीने लहरींची गती देखील मंदावते. एव्हाना आसवांच्या लाटेने मनडोहातील नैराश्याचा निचरा झालेला असतो. अतरंगात उरते ती फक्त निर्मळता". कवी मनाच्या कस्तुरीच्या या लेखाचा शेवट कवितेने होणे उचितच की!

'लेवून पैठणी सोनरंगी
उजळून आली सकाळ..
सोनसळी त्या स्पर्शाने
फुले चैतन्याची माळ..
पानापानात अमृतकण
परिमल भिजल्या क्षणात
सुखाचे सांजण व्हावे




रोज आपल्या जीवनात'

'पितृपक्ष' हा असाच वेगळ्या विषयावरचा लेख. हे पंधरा दिवस आपल्या पूर्वजांचे स्मरण करण्याचे, त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचे असतात. मग त्याला अशुभाची झालर का असावी? किंवा सुधारणेच्या नावाखाली या काळातील विधींना विरोध वा त्यांची टिंगलटवाळी तरी का करावी? आईवडील हयात असताना जे त्यांची उपेक्षा करतात वा त्यांना वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवतात त्यांनी पितृपक्षात कावळ्यांना मिष्टान्न भोजन देणे हा निव्वळ ढोंगीपणा आहे हे खरे असले तरी याची दुसरी बाजूही लेखिका दाखवून देते ती अशी,

**अरुण कमळापूरकर**

"नाण्याची एकच बाजू पाहून कसे चालेल! जुन्या व नव्या विचारांची सांगड घालणे गरजेचे आहे. आपण जे पूजाविधी करतो त्यासाठी लागणारे जे साहित्य विकत घेतो त्यावर अनेकांचा उदरनिर्वाह होत असतो. मग त्या प्रथा बंद करण्यापेक्षा प्रथा साजऱ्या करताना त्यासोबत समाजकार्य केले तर काय हरकत आहे? पितरांच्या नावाने काकवळ ठेवल्यानंतर जर एखादा मुलगा अथवा मुलगी वृद्धाश्रमाला भेट देऊन तिथल्या वंचितांची सुख दुःख वाटून घेत असेल तर काय हरकत आहे? ज्या चालीरीतींनी कोणाचा पूर्णतः फायदा होत नसेल परंतु नुकसानही होणार नसेल तर ती प्रथा आणि सामाजिक भान जपल्यास संस्कृती आणि जाणिवांचा सुरेख मिलाप होईल.

निसर्गाने अन्य सजीवांपेक्षा मानवाला दिलेली बहुमोल देणगी म्हणजे वाणी अर्थात शब्द. या शब्दांच्या सामर्थ्याचा आढावा घेतलाय तो 'शब्द सामर्थ्य' या लेखात. शब्द कधी कठोर असतात तर कधी मुलायम. कठोर शब्दांनी झालेल्या जखमा धारदार शस्त्राने केलेल्या जखमेपेक्षाही तीव्र असू शकतात. अन् त्या भरून काढण्यासाठी औषध लागू पडते ते मुलायम शब्दांचेच. त्यामुळे शब्द जपून वापरावेत हेच खरे.

शब्दांची विविध रूपे विषद करताना लेखिका आधार घेते तो तिच्याच कवितेचा

तर असा हा शब्द..

"बाल मुखातून टपटपताना बोबडी अंगाई होतो..
संत मुखातून ओथंबताना संतवाणी होतो..
भुकेल्याच्या ओठी थरथरताना आर्त गाणी होतो..
प्रियकर प्रेयसीच्या प्रेमात व्याकुळताना प्रेम कहाणी होतो..
अन् साहित्यिकाच्या वाणीतून बरसताना श्रोत्यांच्या काळजाचे पाणी होतो.."

या ग्रंथाचे शीर्षक ज्या लेखाच्या नावावरून योजलंय तो आहे "ती घरात बसली म्हणून"

अर्थार्जन करून संसाराला हातभार लावणाऱ्या महिलांबद्दल आदर असायलाच हवा पण केवळ 'गृहिणी' हे बिरुद मिरवणाऱ्या स्त्रियांचाही तितकाच आदर व्हायला हवा पण दुर्दैवाने तसे होत नाही. लेखिका गृहिणी असल्याने तिला हे अनुभव येतातच. "तुम्ही गृहिणी ना. भरपूर वेळ असेल तुमच्याकडे घरात बसून म्हणून लिहायला वेळ मिळतो तुम्हाला.." यासारखे शेरे तिला नित्य ऐकायला मिळतात. खरंतर अर्थार्जन करणाऱ्या स्त्रियांना जेवढे कष्ट करावे लागतात तेवढेच कष्ट घरात दिवसभर राबणाऱ्या माउलीला करावे लागतात. तिला दर महिन्याला पगार मिळत नसला तरी तिच्यावरील जबाबदाऱ्या पार पाडताना ती कुठलीच कसर ठेवत नाही.

"मुलांचे उत्तम संगोपन करणे, त्यांच्यावर चांगले संस्कार करणे, घरातील मंडळींना काय हवं नको ते पाहणे, घरी येणाऱ्या पाहुण्यांचे आदरातिथ्य करणे, मुलांच्या शाळेची जबाबदारी, बाजारहाट, एक ना अनेक जबाबदाऱ्या पार पाडताना दिवस कधी मावळतो ते समजत देखील नाही. या सगळ्यातून थोडासा वेळ मिळालाच तर तिने साधी विश्रांती सुध्दा घेऊ नये का? या दमलेल्या माउलीला फक्त दोन शब्द आदराचे हवे असतात. ते मिळाल्यावर ती पुन्हा नव्याने उर्जा घेऊन कामाला लागते." ही लेखिकेची अपेक्षा गैरवाजवी आहे असे कोण म्हणू शकेल?

या पुस्तकात एकूण तेहेतीस लेख आहेत. सर्वांचा धांडोळा घेणे प्रस्तावनेच्या शब्द मर्यादेत शक्य नाही. मात्र यातील प्रत्येक लेख निःसंशय वाचनीय आहे. निसर्ग, आजूबाजूचा समाज याबद्दल वाटणारी आस्था, आपली संस्कृती, परंपरा याबद्दल वाटणारा रास्त अभिमान याचे दर्शन या पुस्तकात ठायी ठायी घडते. लिखाणात एक ओघ आहे. कृत्रिम शब्दबंबाळपणा तर अजिबात नाही. तरीही वाचकांना खिळवून ठेवण्याचे सामर्थ्य कस्तुरीच्या लिखाणात आहे हे नक्की. या पुस्तकाचे रसिक वाचक नक्कीच स्वागत करतील याची खात्री आहे. साहित्य क्षेत्रातील पुढील वाटचाली साठी तिला भरभरून शुभेच्छा.

**ललित लेखसंग्रह : ती घरात बसली म्हणून..**
**प्रकाशन : शॉपीजन, संपर्क - ८२९११४९९९२.**

# ऋतुजाताई : चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व

आधुनिक केसरी

गणपतीची कुशाग्र बुद्धी, लक्ष्मीची ऐश्वर्य संपन्नता व सरस्वतीची वाणी यांचा सुरेख संगम म्हणजे अमेरिकेत वास्तव करीत असलेल्या सौ. ऋतुजा दिनेशराव इंदापुरे-कोरडे होत. सौ. ऋतुजाताई यांच्या भेटीचा योग माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे निवृत्त संचालक तथा न्युज स्टोरी टुडे पोर्टलचे संपादक श्री देवेंद्र भुजबळ यांच्या नवी मुंबईतील घरी अनपेक्षित पणे घडून आला. सौ. ऋतुजाताई या गेल्या पंधरा दिवसांपासून भारतात त्यांच्या नातेवाईकांच्या भेटीगाठी घेण्यासाठी आल्या होत्या . काल त्या अमेरिकेला जाण्यासाठी नवी मुंबईमार्गे मुंबईला जाताजाता वेळात वेळ काढून सानपाड्याला श्री देवेंद्रजी भुजबळ यांनी विनंतीवजा आग्रह केल्याने त्यांच्या घरी आल्या. ऋतुजाताई यांचे सोबत त्यांचे चिरंजीव तनुष व त्यांचे दोन चुलत भाऊ पण होते. श्री देवेंद्र व सौ. अलकाताई भुजबळ यांच्याशिवाय याप्रसंगी श्री प्रकाशराव व त्यांच्या पत्नी सौ. शमाताई मांगले, श्री अवधुत व सौ. शोभाताई तिवाटणे, श्री लक्ष्मीकांत तांबट, डॉ. सौ. जयश्रीताई लोखंडे व त्यांची दोन मुले आणि मी स्वतः म्हणजे लक्ष्मीकांत विभुते उपस्थित होतो.

नवी मुंबई कासार समाजातर्फे सौ. ऋतुजाताईंचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. तसेच श्री देवेंद्र व सौ. अलकाताई भुजबळ चालवित असलेल्या न्युजस्टोरीटुडे पोर्टलतर्फे एक छानसा मग त्यांना भेट दिला.

सौ. ऋतुजाताईंचा आजवरचा संपूर्ण प्रवास थक्क करणारा आहे. त्यांचे माहेर पुण्यात तर सासर नागपूरला आहे. त्यांचे वडील श्री शिवाजीराव व आई सौ. विमलताई इंदापुरे हे दोघेही महाविद्यालयात प्राध्यापक होते. अशा या बुद्धिजीवी परिवारातील सौ. ऋतुजाताईना लहानपणापासूनच खेळाची विशेषतः बॅडमिंटनची खुप आवड होती. त्यासाठी पहाटे उठून धावणे व इतर व्यायाम करणे या गोष्टी त्या कटाक्षाने करीत होत्या.

आईच्या नोकरीमुळे सौ. ऋतुजाताईंचे बालपण नागपूर येथे गेले. त्यांनी हायस्कूलपर्यंतचे शिक्षण तिथेच घेतले.तर त्यापुढील महाविद्यालयीन शिक्षण पुणे येथे घेतले. त्यानंतर त्यांनी इंग्लंड मधून वकिलीतील मास्टर्स पदवी सुवर्ण पदकासह प्राप्त केली. त्यांनी एक वर्ष मुंबईला वकील म्हणून काम केले.

अशा या हरहुन्नरी व्यक्तिमत्त्वाला साजेशा जोडीदाराची साथ लाभली ती मुळचे नागपूर येथील रहिवासी पण अमेरिकेत स्थायिक श्री दिनेशराव कोरडे यांची. ते सध्या अमेरिकेत ॲमेझान



कंपनीत उच्च पदावर कार्यरत आहेत. यांना एक मुलगी (इशा) व एक मुलगा (तनुष) अशी दोन अपत्ये आहेत.

सौ. ऋतुजाताई या अमेरिकेतील वॉशिंग्टन स्टेट मधील सम्मानीश सीटीच्या नवनिर्वाचित नगरसेविका आहेत. तसेच सियाटेल सन्मान योजनेच्या वॉशिंग्टन स्टेटच्या वूमेन कमिशनर असून कॉस्को या अमेरिकेतील आयटी क्षेत्रातील नामांकित कंपनीच्या त्या मॅनेजर देखिल आहेत. त्या उत्कृष्ट राष्ट्रीय बॅडमिंटन पटू असून बॅडमिंटन क्षेत्रात त्यांनी सुवर्णपदके प्राप्त करुन आपला वेगळाच ठसा उमटविला आहे. आणि विशेष म्हणजे त्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्पीकर पण आहेत.

अशा सर्वव्यापी चतुरस्त्र नेतृत्वाची काल ओळख झाली.

**लक्ष्मीकांत विभुते**

अमेरिकेतील सामाजिक कार्य, निवडणूक प्रक्रिया, विविध देशांतील नोकरी निमित्ताने आलेले व स्थानिक अमेरीकन यांच्यातील संबंध अशा विविध विषयांवर भरपूर गप्पा रंगल्या.

त्यांना भारतातील आपल्या समाजाबद्दल काय वाटते हे जाणून घेतांना समाजाचे अध्यक्ष मा. शरदराव भांडेकर यांचे कारकीर्दीत सुरू असलेली कामे तसेच "मिशन प्रशासन" चे कार्य खुप चांगले असून आपल्या समाजातील होतकरू तरुणांनी याचा निश्चित लाभ करून घ्यावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

भेटीतील चर्चेत गप्पा एवढ्या रंगल्या की दोन तास कसे निघून गेले कळलेच नाही. सौ. ऋतुजाताईंना मुंबईहून अमेरिकेला जायचे असल्याने रंगलेल्या गप्पा आटोपत्या घेऊन परत एकदा त्यांना शुभेच्छा देऊन सर्वांनी निरोप दिला. खरोखरच ऋतुजाताईंचे जीवन ,कार्य सर्वांसाठी विशेषतः तरुण पिढी साठी खूपच अनुकरणीय आहे, हे निश्चितच जाणवले.

**संपादन : देवेंद्र भुजबळ, मो. 9869484800**

# शेती आणि निसर्गात रमलेले ना. धों. महानोर



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**महनोरांचा शेती विषयीचा जिव्हाळा, प्रेम,व्यक्त करते. शेत, रान हे महानोरांचे बलस्थान आहे. रानाचे, शेताचे आणि महानोरांचे एकमेकावर अतिशय प्रेम आहे. एकमेकांच्या सुखदुःखात एकरूप झालेले आहेत. एकमेकांना एकमेकांचा लळा लागला आहे. निसर्ग, रान, शेतीशी ते आपलं सुख दुखाःविषयी बोलतात, हे बोलणेच त्यांची कविता होऊन आपल्यासमोर उभी आहे. शेतावरील समृध्द अनुभवाने ती नटली आहे. कुठेही अनुभवाची औपचारीकता नाही.**

"रानातल्या कविता " हा रानकवी पद्मश्री ना.धों. महानोर ह्यांचा पहिला काव्य संग्रह.१९६७ साली नवे कवी-नवी कवीता ह्या मालिकेत पाप्युलर प्रकाशनाने तो प्रसिद्ध केला.त्याला राज्यशासनाचे केशवसुत पारितोषिकही मिळाले.

ह्या शेताने लळा लाविला असा.. असा.. की
सुखदुःखाला परस्परांशी हसलो-रडलो
आता तर हा जीवच अवघा असा जखडला
मी त्याच्या हिरव्या बोलीचा शब्द जाहलो.....

कविता संग्रहातील ही पहिलीच कविता. महनोरांचा शेती विषयीचा जिव्हाळा, प्रेम,व्यक्त करते. शेत, रान हे महानोरांचे बलस्थान आहे. रानाचे, शेताचे आणि महानोरांचे एकमेकावर अतिशय प्रेम आहे. एकमेकांच्या सुखदुःखात एकरूप झालेले आहेत. एकमेकांना एकमेकांचा लळा लागला आहे. निसर्ग, रान, शेतीशी ते आपलं सुख दुखाःविषयी बोलतात, हे बोलणेच त्यांची कविता होऊन आपल्यासमोर उभी आहे. शेतावरील समृध्द अनुभवाने ती नटली आहे. कुठेही अनुभवाची औपचारीकता नाही.

महानोरांचे कविते बद्दल विजया राजाध्यक्ष म्हणतात-"रान हे त्यांचे ध्यान,त्यांचा साक्षात्कार. एकदा हा साक्षात्कार झाला की नभ आणि भुई यांच्यातील भावसंबंध जाणवू लागतो.डोळे भरून येतात.जीव तेथेच गुंतून राहातो...हीच भावना महानोर आपल्या कवितेच्या माध्यमातून व्यक्त करतात.

गुंतलेले प्राण हे रानात माझे
फाटकी ही झोपडी काळीज माझे...

रानातल्या कवितेच्या पासून त्यांचा हा प्रवास अखंड सुरू आहे...

पानझड, पावसाळी कविता, पक्षांचे लक्ष थवे,दिवे लागणीची वेळ,पळसखेड ची गाणी, वही,अजिंठा, कविता संग्रह. तसेच रानगंधाचे गारुड, अंगारमाती, आनंदयोगी पु.ल. ,शेती आत्मनाश व नवसंजीवन, यशवंतराव चव्हाण, शरद पवार आणि मी,विधान भवनातून,या शेताने लळा लाविला, प्रार्थना दयाघना,जगाला प्रेम अर्पावे,गंगा वाहू दे निर्मळ,गांधारी कादंबरी,

आणी शेती विषयावर मार्गदर्शन करणारी ,कमी पाण्यावर येणा-या तेलबिया, मोसंबी, मिरची, कमी पाण्यावरची वनशेती,फलोत्पादन, शेती साठी पाणी,सीताफळ बागेची गोष्ट, अशी अनेक पुस्तके त्यांनी लिहिलीत. ह्या सर्व प्रवासात शेतीला मात्र त्यांनी आज पर्यंत घट्ट धरुन ठेवले आहे.

पळसखेड हे सोयगाव तालुक्यातील महानोरांचे लहानसे खेडगांव.वडिलांनी पंचवीस -तीस वर्ष जमीनदारांचे कडे शेतावर मजुरी केली..ती करत असता उसनवारीवर पैसे घेउन थोडी जमीन घेतली. जमीन बरड असल्याने खूप कष्ट करावे लागायचे... त्यात विहीर खोदली..तिला ब-या पैकी पाणी लागल.त्यात मिरची,गहू, हरभरा,ज्वारी, बाजरी, कपाशी, अशी पिक येऊ लागली.बेताची आर्थिक परिस्थिती आणि वडिलांना शेतीत मदत म्हणून काँलेजचे शिक्षण सोडून शेती करायला घरी परत आले.महानोर सांगतात- "शिक्षण सोडल्याने सगळं गांव मला हसायचा.पण त्या कडे दुर्लक्ष करुन मी शेती करु लागलो.कृषितज्ञालाही लाजवेल असा अनुभव त्यांच्या वडिलांना होता.हळूहळू विहिरीवर मशिन बसवले. बागायती करु लागलो.शेती आणि शेतक-यांविषयी नितांत प्रेम असल्यामुळे मी शेती करत होतो.तिथल्या पिकांचा मला लळा लागला होता.शेतातल्या झोपडीत राहाणे मला आवडायचे."ह्या झोपडीतच त्यांनी अनेक पुस्तकांच वाचन कंदिलाचे प्रकाशात केल.

शेती विषयी अनेक प्रयोग त्यानी केले.थोडं पाणी असेल तर शेतीइतकं सुंदर काही नाही असे त्यांनी केलेल्या प्रयोगातून दाखविले. त्यांचे हे शेतीवरचे प्रयोग पहाण्यासाठी पु.ल.देशपांडे, सुनीताबाई,बा.भ.बोरकर,गोविंदराव तळवळकर, दोन दिवस पळसखेडला येऊन राहिले. त्यावेळी उरळीकांचनचे नामवंत शेतकरी बापू कांचन ही त्यांचे सोबत होते.

त्यांच्या कुटुंबाला अनेक प्रतिकूल प्रसंगातून जावे लागले अनेक आघात झाले. अनेक अडचणीवर मात करुन शेती करत होते..ते म्हणतात "कधी जमलं कधी जमले नाही,हरलो म्हणून थांबलो नाही, की नाराज झालो नाही.शेती करायची तर हुरहुन्नरी पद्धतीने. जिथून मिळेल तिथून शेतीच ज्ञान घेउन प्रयोग करत राहिलो. प्रत्येक पिकाच्या हंगामाने, फळांच्या हंगामाने पुष्कळ दिलं..कवितेनीही खूप हात दिला.अनेक पुरस्कार मिळाले. त्यामुळे फार मोठा आर्थिक आधार मिळाला." सततचे दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट,सारख्या संकटांना तोंड देत शेतीत टिकून जिद्दीने उभा राहिलो. नवनवीन प्रयोग करुन शेती बहरत गेलो.

शेती..आणि कविता ..ह्या प्रवासात महानोरांनी ..जैत रे जैत,सर्जा, एक होता विदूषक,दोघी,मुक्ता, अजिंठा, सह जवळजवळ अकरा चित्रपटात गितं लिहिलीत..जैत रे जैत साठी तर सोळा गितें लिहिलीत..ती खूप लोकप्रिय झाली.."पद्मश्री" मिळाली.पानझड कविता संग्रहाला -"साहित्य अकादमी"चा पुरस्कार,कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा



-"जनस्थान" पुरस्कार,महाराष्ट्र शासनाचा- "जीवन गौरव" पुरस्कार, म.टा.चा -महाराष्ट्र भुषण,यशवंराव चव्हाण प्रतिष्ठानचा-यशवंत वेणू,ए.बी.पी.माझाचा -सन्मान पुरस्कार, पंजाबराव कृषीविद्यापिठाचा कृषीरत्न पुरस्कार. अशा अनेक पुरस्कारांनी ते सन्मनित झाले. बारा वर्षे ते विधान परिषदेत आमदार होते.त्या काळात साहित्या सोबतच शेती विषयालाही तेवढेच प्राधान्य दिले. नवलेखकाच्या पहिल्या पुस्तकाला शासकिय अनुदान देण्याचा निर्णय त्यांचेच कार्य काळात झाला,तर पाणी अडवा पाणी जिरवा कार्यक्रम घोषणा त्यांनी केली.

बृहन्महाराष्ट्र साहित्य संमेलन -न्यू जर्सी, कँलीफोर्निया,जागतिक मराठी साहित्य संमेलन -माँरीशस, ईथेही साहित्य संम्मेलना बरोबर तिथल्या शेतीचा विचार मनात ठेवून, पाहणी करुन आपल्याला काही करता येईल का? हा विचार घेउन येत होते. २००१ मध्ये नागपूरला झालेल्या अ. भारतीय जल साहित्य संमेलनचे अध्यक्षपद त्यांनी भुषविले.

शेतीतून कविता, आणि कवितेत शेती..निसर्ग ह्या परस्परांशी जोडलेल्या गोष्टी होत्या.. शेती ही केवळ शेतकऱ्यांची नसते, सगळ्यांची असते.संपूर्ण देशाला उभारणी देणारी असते.शेती मोडली तर संपूर्ण देश मोडण्याची शक्यता असते.अस स्पष्ट मत ते मांडतात.सर्व शेतक-यांना संपूर्ण कर्ज माफीच ते समर्थन करीत नाही.कर्ज माफीच्या सवयीने देश-शेतकरी पांगळा,आळशी होण्याची भिती व्यक्त करतात. त्या ऐवजी दीर्घकाल कर्ज,विजेची उपलब्धी,शेती मालाला भाव,सोई सुविधांच द्या हि अपेक्षा व्यक्त करतात.आत्महत्येचा मार्ग अत्यंत चुकीचा मार्ग आहे,उभारीचे दिवस येत असतात..हा विश्वास ते शेतक-यांना देतात.या नभाने या भुईला दान द्यावे म्हणून प्रार्थना करतात.

पु. ल. देशपांडे, सुनीता बाई, माधवराव चितळे, किर्लोस्कर, शंकरराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण, शरद पवार,गोपिनाथ मुंढे, एकनाथ खडसे, मंगेशकर कुटुंबीय अनेक मान्यवरांनी पळसखेड ला भेट दिली.अनेकदा काव्यवाचनाचे कार्यक्रम रंगले. त्यासोबत शेतीविषयक चर्चा घडून आल्यात. शहरी राजकारण्यांशी, कलाकारांशी, साहित्यिकांशी त्यांचा जवळून संबंध आला. कारणपरत्वे शहरांमध्ये राहणे झाले, पण त्यांचा पळसखेडमधला साधेपणा तसाच राहिला आहे. मुंबई-पुण्यात घर बंगला घेवून राहण्याचा मोह त्यांना झाला नाही. शेत आणि कविता ह्यातच ते पूर्ण रमले आहेत. अजूनही आपल्या शेतावरच त्यांचा रहिवास आहे.

पंचेहत्तरीचे अमृत मोहोत्सवी कार्यक्रमात पु. ल. देशपांडे ह्याची आठवण सांगताना शरद पवार म्हणाले -पु. ल. म्हणायचे "महानोर कविता म्हणताना धोऽ धोऽ बरसतात. ते ना.धों. नाही तर धो ऽ धो ऽ महानोर आहेत." आणि खरंच आहे.

काही दिवसापूर्वी मला त्यांचे निसर्ग रम्य शेतावर जाण्याचा योग आला आणि ह्या धो ऽ धो बरसण्याचा अनुभव मी घेतला. महानोर तिथे होते. मग काय बऱ्याच गप्पा गोष्टी झाल्यात.कविता, शेती, चित्रपट, राजकारण, साहित्यसंमेलन प्रत्यक्ष महानोरां कडून -

ह्या शेताने लळा लाविला असा असा की...आणी ह्या नभाने ह्या भुईला दान द्यावे..आणि ह्या मातीतूनी चैतन्य गावे.. ..कविता ऐकायला मिळाल्या..

महानोरांची कविता बरसत होती, त्याच वेळी पाऊस धो धो बरसत होता..आणि आम्ही त्यांचे सोबत वाफाळलेल्या चहाचा आस्वाद घेत होतो. त्यांचीच एक पावसाळी कविता...

मी माझ्या मुलखात नांदतो ऐश्वर्याचा राजा.
ईथल्या मातीमध्ये रूजविल्या चैतन्याच्या बागा
इथले रानोमाळ सघन घन पसरित हिरवी द्वाही
झुलत झुलत मस्तीत बुडाले गाणे आणिक मीही...

ह्या त्याच्याच कवितेचा प्रत्यक्षात अनुभव घेउन तृप्त झालो.

# वळीवाचा पाऊस...



भिमराव परघरमोल
मो.नं. 9604056104

आधुनिक केसरी

**तीस ते पस्तीस वर्षांपूर्वीची एक सत्यकथा. एका गावांमध्ये एक छोटं कुटुंब राहत होतं. त्यावेळेसच्या परिस्थितीत सापेक्षा अनेकांनी अपत्यजन्माचा अर्ध्या डझनाचा पल्ला गाठलेला होता. परंतु त्या छोट्या कुटुंबात दोन मुलं आणि एक मुलगी अशा पाव डझनावरच त्यांनी समाधान का मानलं असावं? हा प्रश्न आजही अनुत्तरीतच आहे. बहुतेक हा सगळा समजूतदारपणा त्या कुटुंबातील मायचा असावा. तसे मायबाप दोघेही अडाणी असले, तरी मायची प्रचंड समजशक्ती, समजूतदारपणा, अनुभवनिष्ठता, नीडरवृत्ती आणि हजरजबाबीपणा इत्यादीमुळे तिचा नातेवाईकांसह गावातही नैतिक व वैचारिक दबदबा होता. तिच्या शब्दाला समाजात मानसन्मान होता. मायचे निर्णय आणि त्यांच्याकडे असणारा जमिनीचा छोटासा तुकडा हेच त्यांच्या सुखाचं गमक असावं, असं म्हणण्यास निश्चितच वाव आहे.**

गाव तसं अगदी छोटसं, म्हणजे चारशे ते पाचशे लोकसंख्येचं. बहुतेक त्यावेळी दहावी बारावीच्या पुढे शिक्षण कुणाचंच नव्हतं. सर्वजण शेतीवर गुजरान करणारे होते. सर्व जाती धर्माचे लोक त्या गावांमध्ये राहायचे. कोणत्याही जातीचा व्यक्ती असला तरी त्याच्यासोबत नात्याची जोड होतीच. (जी आजही कायम आहे) तरीही जाती श्रेष्ठत्वाची भावना अनेकांच्या मनामध्ये तेवतच होती. तेवढ्यातच एका पक्ष संघटनेचं जातीयवादी, विषमतावादी, सत्तापिपासु वारं निघालं आणि बघता बघता संपूर्ण राज्यभर त्याची वावटळ पसरू लागली. त्या वावटळीचा दुर्गंधी धुराळा त्या छोट्याशा गावच्या वेशिवर येऊन थांबला. आणि पाहता पाहता त्याने गावात प्रवेश केला. गावाची अवकळा सुरू झाली. दोन गटांमध्ये नाहक वितंडवादाला होऊन, विनाकारण घोषणाबाजी व्हायला लागली. नात्यांच्या विनीत गुंफून एकमेकांना मानसन्मान देणारे लोक परस्परांना पाण्यात पाहू लागले. नात्याची विन केव्हा उसवली हे कुणालाच कळत नाही. अल्पसंख्यांक मागासवर्गीयांवर अन्याय अत्याचाराची मालिका सुरू झाली एक-एकट्याला शोधून, गाठून त्यांच्यावर हल्ला करण्यात येऊ लागला. त्यांची सर्वांगाने कोंडी व्हावी म्हणून त्यांना कामं मिळणे दुरापास्त झालं. उपासमारीची वेळ येऊ लागली त्यामुळे पोटाची खळगी भरण्यासाठी काही लोकांनी गाव सोडणे पसंत केलं. तर काही आजूबाजूच्या खेड्यापाड्यावर जाऊन काम मिळवून स्वाभिमानाने जीवन जगू लागले. त्याचवेळी जातीयवादी वाटळीचं वादळात रूपांतर होऊन, संपूर्ण राज्यभर जातीय व सांप्रदायिक दंगयांनी पेट घेतली. त्याची एक ठिणगी त्या छोट्याश्या गावांमध्येही पडली. तिथेही तिथेही दंगल उसळली. अल्पसंख्यांक मागासवर्गीयांची छोटीशी वस्ती, त्यातही काही लोक पोटापाण्यासाठी भटकंतीला गेलेले. तरीही त्यांनी प्रखर प्रतिकार केला. त्या कुटुंबातील माय सुद्धा रणरागिणीसारखी दंगलीत सहभागी झाली होती. त्यामुळेच की काय? मुठभर अल्पसंख्यांक काबुत येत नव्हते. म्हणून संधी साधून प्रस्थापितांनी खेड्यापाड्यावरील पक्ष संघटनेच्या कार्यकर्त्यांना पाचारण करून गावाच्या रस्त्यांची आणि वस्तीची नाकेबंदी केली. जीव मुठीत धरून लोक आपापल्या घरांमध्ये कैद झाले. त्या सुखी कुटुंबाच्या घरामध्येही काही महिला-पुरुषांनी आसरा घेतला. नेमकं तेच हल्ला करणाऱ्या झुंडीच्या लक्षात आल्यावर त्यांनी त्या घरावर हल्ला चढवला. घराचा दरवाजा बऱ्यापैकी पक्का होता. परंतु चार पैकी एक भिंत कुडाची असल्याची उशिरा का होईना, पण त्यांच्या लक्षात आलं. म्हणून त्यांनी त्याकडे धाव घेऊन ती भिंत तोडायला सुरुवात केली. तिला शेनामातीचा गिलावा असल्यामुळे ती लवकर तुटत नव्हती. तरी तिची कुवत जास्त टिकणारी नव्हती. तिला अस्ताव्यस्त करून आत शिरणार तेवढ्यात गावात प्रवेशीलेल्या पोलिसांच्या गाडीचा सायरन वाजला. तो ऐकून हल्ला करणाऱ्यांची झुंड पळून गेली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. अन्यथा त्या घरामध्ये दबा धरून बसलेल्यांपैकी कित्येकांचे मुडदे पडले असते? याची कल्पना न केलेलीच बरी.

त्यानंतर पोलिसांकडून अनेकांची धरपकड सुरू झाली. कित्येकांना कोठडीत दिवस काढावे लागले. जामीनानंतर अपेक्षेप्रमाणे जनजीवन पूर्वपदावर आले नाही. पुन्हा तेच बहिष्काराचं शस्त्र!त्यामुळे गोरगरिबांचे हाल होऊ लागले. त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली. अनेक कुटुंब परागंदा झाले. पर्याय नसल्यामुळे त्या गावातील त्या छोट्या कुटुंबातील मायच्या सूचनेप्रमाणे तिच्या सग्यासोयऱ्यांचा आसरा घेऊन एक सधन गाव गाठलं. तिथे गेल्यानंतर आपुलकीने विचारपूस करणाऱ्या आदरयुक्त नजरांची दिशा केव्हा बदलली हे कळलेच नाही. सहारा मिळालेल्या गावांमध्ये कामांची रेलचेल होती. परंतु कोणाच्याही वळचणीला आसरा मिळाला नाही. म्हणून एका शेतातील आंब्याच्या झाडाखाली त्यांनी आशियाना थाटला. त्या झाडाने खूप माया दिली. उघड्या संसारावर कोणतेही संकट येऊ दिले नाही. त्यामुळे त्याच्या कुशीत थंडी उन्हाचे दिवस न आठवता भराभर निघून गेले. परंतु पावसाळ्याची चाहूल लागतात आपल्या चिल्यापिलांचे वादळ वाऱ्यासह पावसापासून संरक्षण व्हावे म्हणून शेतातच छोटासा निवारा असावा असे त्या कुटुंबातील मायने सुचवले. त्यावर कुटुंबप्रमुखाने अंमल करत मोठ्या कष्टाने लाकूड-फाटा गवत-काडीपासून दोन पाख्यांचा झोपडी वजा निवारा तयार केला. त्याला पाहून त्या मायचा आनंद गगनात मावेनासा झाला. कदाचित आज दोन मजली इमारत पाहूनही जेवढा आनंद होणार नाही तेवढा आनंद तिला झाला असावा? परंतु तो आनंद फार काळ टिकू शकला नाही. एका रात्री वादळ-वारा, विजांच्या कडकडासह वळीवाचा पाऊस सुरू झाला. पावसासह वाऱ्याची गती, दिशा, आणि तीव्रता एवढी प्रचंड होती की, झोपडी केव्हाही उडून जाण्याची भीती नाकारता येत नव्हती. म्हणून त्यांनी त्यांच्या पिल्लांना खाटेखाली सुरक्षा घेण्यास सांगून दोघं पतिपत्नीने झोपडीच्या आड्याला पकडून ठेवण्यास सुरुवात केली, जेणेकरून ती उडून जाऊ नये. परंतु हवेच्या जोरामुळे त्यांच्यासह ती झोपडी वर उचलली जात होती. त्या मायला स्वतःऐवजी आपल्या लहानग्यांची काळजी प्रमाणापेक्षा जास्त वाटत होती. म्हणून ती पृथ्वीतलावरील असतील नसतील त्या तेहतिस कोटींचा धावा करत होती. ती सहृदयी, काळजाच्या देठापासून तिला माहीत असलेल्या देव देवतांची याचना करत होती कारण कोणत्याही वेळी मोठ्यात मोठा अनर्थ होण्याची शक्यता नाकारता येत नाही, हे ती समजून होती कारण आजूबाजूच्या झाडांच्या फांद्या काट्याकुट्यांचे फास हवेत कडब्याच्या पात्यांप्रमाणे गिरट्या घालत होते. हे सर्व विजेच्या लख्खप्रकाशात पाहायला मिळत होतं. हा जीवाचा थरकाप उडवणारा आणि काळीज पीळवटून काढणारा, वेळोवेळी मरणाची जाणीव करून देणारा थरार तास-दीडतास पर्यंत सुरू होता. शेवटी निसर्गालाच त्यांची दया येऊन त्यानेच त्यांच्यावर कृपादृष्टी दाखवत, त्यांचे कोणतेही नुकसान न करता वादळ-वारा, विजांसह वळीवाचा पाऊसही शांत झाला. आणि सर्वांचा जीव भांड्यात पडला.

# मोदींमुळे देशात रोजंदारी कामगारांच्या आत्महत्या

## भाकपाच्या राष्ट्रीय सचिव अमरजीत कौर यांचा घणाघात : तीन दिवसीय 24 व्या राज्य अधिवेशनाची सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज




**अमरावती :** केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे आपण शेतकरी आत्महत्यांचे दुखः झेलतो आहे. मात्र, चुकीच्या धोरणामुळे देशात बिकट आर्थिक समस्या निर्माण केली आहे. केंद्रातील मोदी सरकारच्या चुकीच्या आर्थिक धोरणामुळे देशात आता रोजंदारी कामगार आत्महत्या करीत असल्याचे वास्तव भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या राष्ट्रीय सचिव अमरजीत कौर यांनी उघड केले. कुटुंबाचे पालन पोषण करण्यास कमी पडत असल्याने रोजंदारी मजूर आत्महत्या करीत आहे. देशात होत असलेल्या एकूण आत्महत्यांमध्ये 25 टक्के रोजंदारी कामगार असल्याचे सरकारच्या क्राईम ब्युरोच्या अहवालातून पुढे आल्याचे कौर यांनी सांगितले. भाकपाच्या 24 व्या तीन दिवसीय राज्य अधिवेशनास अमरावती येथील नेमानी इन येथे रविवार, 18 सप्टेंबरपासून सुरूवात झाली आहे.

या अधिवेशनाचे उद्धाटन करताना कौर यांनी मोदी सरकार विरोधात पेटून उठण्याचे आवाहन नागरिकांना केले.

भारत हे वेलफेअर स्टेट म्हणजेच सामाजिक सेवा दायित्वाचे राज्य आहे. मात्र, 2014 मध्ये सत्ता मिळाल्यापासून मोदी सरकारने जनहिताचा सर्वनाश करून केवळ अदानी व अंबानी यांना श्रीमंतीच्या उच्च शिखरावर पोहोचवले आहे. जनतेला मिळणाऱ्या सर्व सेवांमध्ये कपात केली जात आहे. शालेय पोषण आहार, अंगणवाडीच्या योजना, राशन आदी विविध लोकपयोगी योजनांवर नरेंद्र मोदी यांनी सत्तेत आल्यापासून हल्ले करण्यास सुरूवात केली. या योजनांमध्ये 10 टक्के राज्य तर 90 टक्के वाटा केंद्र सरकारचा होता. मात्र, मोदी सरकारने सामाजिक योजनांचा 40 टक्के वाटा राज्यांवर टाकला आहे. आता तर सामाजिक सेवाच बंद केल्या जात असल्याचे अमरजीत कौर म्हणाल्या.

सामाजिक योजना बंद करीत केंद्रातील मोदी सरकार आपणास संपवू पाहत आहे. असे असले तरी आत्महत्या करु नका, आपणास समाप्त करु पाहत असलेल्यांना समाप्त करण्यासाठी संघर्षाच्या लढाईत उतरा, असे आवाहन त्यांनी जाहिर सभेला जमलेल्या हजारो नागरिकांना केले. मोदी सरकारने शेतकरी शेतमजूर,कामगार, विद्यार्थी, युवक,महिला या समाज घटकाला बरबाद करून केवळ अदानी आणि अंबानीला संपत्तीच्या सर्वात मोठ्या शिखरावर नेऊन पोहोचवले आहे. त्यामुळे येत्या 2024 च्या लोकसभा निवडणुकीत या सरकारला पायउतार करण्यासाठी जनतेने संघटित झाले पाहिजे असे त्या म्हणाल्या. यावेळी राष्ट्रीय सचिव कॉ. भालचंद्र कांगो यांनी देखील सभेला संबोधित केले. यावेळी मंचावर स्वागत समितीचे अध्यक्ष प्रा. साहेबराव विधळे, कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा राज्याचे सचिव तुकाराम भस्मे, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे उदय नारकर, नामदेव चव्हाण, कॉ. शिवकुमार गणवीर, कॉ. राम बाहेती, कॉ. भास्कर लहाने, आयटकचे राज्याध्यक्ष सि. एन. देशमुख, सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाचे किशोर किशोर ढमाले, इत्यादी मंचावर उपस्थित होते.

सर्वप्रथम इर्विन चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून अमरजीत कौर यांनी पुतळ्याला हारार्पण करून अभिवादन करून सुरुवात केली. लाल रंगाच्या टी-शर्ट घातलेले स्वयंसेवक सर्वात पुढे, ढोल ताशे तसेच गगणभेदी घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. रेल्वे स्टेशन, राजकमल चौक, जयस्तंभ चौकात महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला हारार्पण केल्यानंतर रॅलीचा समारोप नेमानी इन येथे करण्यात आला.



# देवपूर भागात महापूर; घरे पाण्याखाली

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरात रविवारी दिवस-रात्र झालेल्या जोरदार पावसानंतर देवपूर परिसरातील सुशी नाला येथे पावसाळी वाहिन्या, नाले तुंबून अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे प्रचंड हाल झाले. पावसाळी वाहिन्या, नाल्यांची योग्य प्रकारे सफाई न झाल्याने ही परिस्थिती ओढावल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. पावसाळा सुरू झाल्यापासून शहराच्या उपनगरांमध्ये ठिकठिकाणी पावसाळी वाहिन्या, नाले तुंबण्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी नालेसफाई, पावसाळी वाहिन्यांची स्वच्छता केल्याचा पालिका प्रशासनाचा दावा फोल ठरला आहे.

शहरात रविवारी जोरदार पाऊस झाल्यानंतर देवपुरातील उर्दू हायस्कूल परिसरातील अनेक घरांत मोठ्या प्रमाणात पाणी शिरले. काही घरांमध्ये अक्षरशः डोक्या एवढे पाणी भरले होते. त्यामुळे नागरिकांची मोठी तारांबळ उडाली. अनेकांना रात्रभर घरात घुसलेले पाणी उपसावे लागले. परिसरात दुर्गंधी पसरली होती. ते शनिनगर ते जमनागिरी रोड नाल्याच्या पुरामुळे थोप मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. त्यामुळे या रस्त्याची वाहतूक बंद झाली होती. या भागात नालेसफाई आणि पावसाळी वाहिन्यांच्या स्वच्छतेची कामे व्यवस्थित झाली नसल्याचा आरोप स्थानिक रहिवासी यांनी केला आहे.

# भविष्यातील सुदृढ मातृत्वासाठी मुलींनी आरोग्याकडे लक्ष द्यावे : प्रा. वंजारे

आधुनिक केसरी न्यूज



**चिंचोली (लिं.) :** अन्न ही मानवाची मुलभूत गरज असून त्यात विविध घटकांचा समावेश केल्यास बालके, किशोरवयीन, गरोदर माता तसेच स्तनदा माता आदींचे आरोग्य निरोगी राहील व त्यामुळे कुटुंब , समाज पर्यायाने देशाचे सामाजिक पोषण चांगले राहून ते देश विकासासाठी उपयुक्त ठरेल असे प्रतिपादन शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय,औरंगाबाद येथील गृहशास्त्र विभागप्रमुख प्रा. माया वंजारी यांनी केले. चिंचोली ( लिं. ) येथील कला व विज्ञान महाविद्यालयाच्या गृहशास्त्र विभागाद्वारे राष्ट्रीय पोषण महिन्यानिमित्त आयोजित " सामाजिक पोषणः समस्या व उपायोजना "या विषयावरील एक दिवसीय राज्यस्तरीय आभासी चर्चा सत्रात प्रमुख वक्त्या म्हणून त्या बोलत होत्या.पुढे प्रा.वंजारे म्हणाल्या की, भविष्यातील सुदृढ मातृत्वासाठी मुलींनी कोणत्याही प्रकारचा संकोच न बाळगता धैर्याने मासिक पाळीकडे लक्ष देणे आवश्यक आहे. तसेच आजच्या जीवनशैलीतील बैठे कामकाजामुळे निर्माण होणाऱ्या आजारांपासून दूर राहण्यासाठी आपण योगासने सारखे व्यायाम करून फास्ट फूड टाळून साप्ताहिक अन्नपत्रकाचे नियोजन करावे.या सर्व नियोजनांचा अभ्यास गृहशास्त्र विषयाअंतर्गत करता येतो म्हणून त्याचा आपण सर्वांनी अभ्यास करावा.

चर्चा सत्रातील दुसऱ्या प्रमुख वक्त्या म्हणून अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाच्या गृहअर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ.संध्या काळे म्हणाल्या की, मानवाच्या सुदृढ आरोग्यातून राष्ट्राच्या विकासासाठी मानवाचे योग्य सामाजिक पोषण होणे गरजेचे असून त्यासाठी प्रादेशिक रचनेनुसार संशोधन होऊन सामाजिक पोषणाचा आराखडा तयार करावा . पुढे डॉ. काळे म्हणाल्या की, योग्य समाज पोषणासाठी शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांचा अभ्यास करून सार्वजनिक ठिकाणी त्यांच्या अंमलबजावणीसाठी समाजातील प्रत्येकाने त्याची जबाबदारी स्वीकारावी.


. अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनकर टकले यांनी सांगितले की, कुपोषण ही सामाजिक पोषण संदर्भातील सर्वात मोठी समस्या आहे. म्हणून समाजातील प्रत्येक घटकांच्या विकासासाठी सामाजिक पोषण उत्तम दर्जाचे असावे. प्रास्ताविक करताना गृहशास्त्र विभागप्रमुख डॉ. वंदना बनकर यांनी सांगितले की, कोणत्याही देशाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी तेथील मानवी आरोग्य हे सुदृढ व निरोगी असावे ज्यामुळे देश कुपोषणमुक्त होईल.

प्रमुख पाहुण्यांचा परिचय मराठी विभागप्रमुख डॉ. अनिता खंडागळे यांनी करून आभार प्रा. प्रतिभा आघार्डे यांनी मानले. चर्चासत्रात राज्यभरातून प्राध्यापक, संशोधक, अभ्यासक ,विद्यार्थी अंगणवाडी सेविका, आशा वर्कर्स , पारिचारीका तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी सह 200 जण आभासी मंचावर उपस्थित होते.

# आयटीआयत मानव कांबळे औरंगाबाद विभागातून तिसरा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** प्रशिक्षण महासंचालनालयाच्या (डीजीटी) वतीने घेण्यात आलेल्या कॉम्प्यूटर



ऑपरेटर अँड प्रोग्रामिंग असिस्टंटच्या (कोपा) परीक्षेत नांदेड जिल्ह्यातील किनवट येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा (आदिवासी) विद्यार्थी मानव रवि कांबळे हा गुणवत्ता यादीत औरंगाबाद विभागातून तिसरा आला आहे.ऑगस्टमध्ये प्रशिक्षण महासंचालनालयाच्या वतीने क्राफ्ट्समन ट्रेनिंग स्कीमच्या परीक्षा घेण्यात आल्या होत्या. या परीक्षेत कॉम्प्यूटर ऑपरेटर अँड प्रोग्रामिंग असिस्टंट (एनएसक्यूएफ) ट्रेडचा विद्यार्थी मानव रवि कांबळे याने ६०० पैकी ५५१ गुण संपादित केले. त्याने मिळवलेल्या गुणांची टक्केवारी ९१.८३ टक्के आहे. या परीक्षेची गुणवत्ता यादी नुकतीच जाहीर झाली असून मानव कांबळे हा गुणाक्रमे औरंगाबाद विभागातून तिसरा तर राज्यातून २९ वा आला आहे. या यशाबद्दल मानवचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# स्वाभिमानी मराठी पत्रकार सघांची बैठक

आधुनिक केसरी न्यूज

धुळे : नुकतीच स्वाभिमानी मराठी पत्रकार संघाची महत्वपूर्ण बैठक संस्थापक अध्यक्ष रामकृष्ण आण्णा नेरकर यांचे प्रमुख उपस्थितीत अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली यावेळी अनेक महत्वपूर्ण विषयावर सविस्तर चर्चा होऊन आगामी काळात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमावर सविस्तर चर्चा करण्यात आली यावेळी एक महत्वपूर्ण विषय मार्गी लावण्यात आला पत्रकार संघाच्या प्रदेश अध्यक्ष पदी किरण संभाजी बागुल यांची सर्वानुमते निवड करण्यात आली तसेच मुख्य प्रदेश संघटक म्हणून राहुल मीनाक्षी वाघ व कायदेशीर सल्लागार पदी ऍड संतोष जाधव यांची निवड करण्यात आली मुंबई प्रदेश अध्यक्ष रतनलाल सावंत कोंकण प्रदेश अध्यक्ष प्रा रुपेश पाटील पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्रीकांत दारोळे व पूर्वी नेमणूक करण्यात आलेले पदाधिकारी त्याच पदावर कार्यरत असतील असे ठरविण्यात आले यावेळी चंद्रगुप्त खैरनार प्रकाश बाविस्कर, विनायक अहिरे ,देवानंद जगताप, लक्ष्मीकांत बेडसे, देवेंद्र पाटील, कैलास गर्दे सर ,मुरलीधर खलाने, देवेन्द्र बनसोडे, दिनेश निकुंभ, नरेश गवळे, विजय मरसाळे, ज्ञानेश्वर सोनवणे, राजू तावडे, युवराज पाटील हेमंत जगदाळे, प्रकाश लोहार, सुनील विभांडीक, बंडूनाना गांगुर्डे, पंकज खरे, डॉ. रवींद्र डांगचे, व इतर अनेक पदाधिकारी उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक रामकृष्ण नेरकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश बाविस्कर तर आभार राज्य प्रसिद्धी प्रमुख देवेंद्र पाटील यांनी मानले कार्यक्रम यशस्वीतेसाठी उमेश कढरे, रितेश चित्ते, पंकज अहिरे, बबलू नवगिरे राकेश निकम दीपक पाटील विजय तिजविज आदींनी परिश्रम घेतले.



# अतिविषारी सर्पदंश; दोन बहिणींचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** मन्यार जातीचा अति विषारी सर्पदंश झाल्याने दोन आदिवासी सख्ख्या बहिणीचा मृत्यू धुळे येथून जवळच असलेल्या वणी (ता. शिंदखेडा) येथे आज पहाटे अत्यंत दुर्दैवी घटना घडली. सर्पदंशाने दोन सख्या बहिणींचा मृत्यू झाला. घटनेमुळे गावात शोककळा पसरली आहे.



वणी येथे गणेश दीपचंद भिल हे राहतात. ते नेहमीप्रमाणे कुटुंबीयांसह घरात झोपलेले होते. आज पहाटेच्या त्यांची मुलगी निकिता गणेश ठाकरे (वय ११) व सविता गणेश ठाकरे (वय १० वर्ष) या दोघा बहिणींना मण्यार जातीच्या सर्पाने दंश केला. ही बाब लक्षात येताच दोघींना पहाटे चार ते पाच वाजे दरम्यान दोंडाईचा येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. वैद्यकीय अधिकारी डॉ. ललितकुमार चंद्रे यांनी प्राथमिक उपचार करून दोघी मुलीची परस्थिती गंभीर असल्याने त्यांना अधिक उपचारासाठी नंदुरबार जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले. तिथे उपचार सुरू असताना दोघींचा मृत्यू झाला. घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान दोंडाईचा येथील आरडीएमपी हायस्कूलमध्ये निकिता ही सातवीत तर सविता पाचवित शिकत होती. दोघा बहिणींवर वणी गावात संध्याकाळी सात वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. दोंडाईचा पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# वृक्ष लागवड करून संवर्धन केल्याशिवाय 'डिग्री' नाही

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड/लातूर :** सर्वच विद्याशाखांच्या विद्यार्थ्यांना पर्यावरण हा विषय अनिवार्य आहे. या विषयाअंतर्गत केवळ थेअरी शिकविले जाते. अंतर्गत आणि विद्यापीठ परीक्षेतील गुण यावर ग्रेड दिला जातो. मात्र, या विषयाअंतर्गत विद्यार्थ्यांना वृक्ष लागवड आणि संवर्धन केल्याशिवाय पदवी प्रमाणपत्र देण्यात येऊ नये, यासाठी लातूरच्या वसुंधरा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा.योगेश शर्मा यांनी पाठपुरावा केला. या संदर्भात त्यांनी लातूर दौऱ्यावर असताना महामहीम राज्यपाल यांना निवेदन दिले. शिवाय, नांदेड विद्यापीठाच्या कुलगुरूंनाही निवेदन दिले. या निवेदनाची दखल घेत विद्यापीठाने तात्काळ परिपत्रक जारी करून पर्यावरण विषयाअंतर्गत वृक्ष लागवड आणि संवर्धन विद्यार्थ्यांसाठी अनिवार्य केले असून, त्याशिवाय पदवी प्रमाणपत्र दिले जाणार नाही, असे स्पष्ट केले आहे. या निर्णयामुळे विद्यापीठअंतर्गत येणाऱ्या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड होऊन संवर्धन होण्यास मदत होईल.

मराठवाडा विशेषतः लातूर जिल्हा हा दुष्काळग्रस्त भागात मोडतो. वनांचे क्षेत्र लातूर जिल्ह्यात इतर जिल्ह्यांच्या तुलनेत अत्यल्प आहे. लातूर जिल्ह्यात वनांचे क्षेत्र वाढण्यासाठी आणि भावी पिढीला वृक्ष लागवड आणि संवर्धनाचे महत्त्व लक्षात यावे यासाठी विद्यार्थ्यांना या कार्यात सहभागी करून घेणे आवश्यक आहे. त्यातच विद्यापीठात सर्वच विद्याशाखांना पर्यावरण हा विषय अनिवार्य आहे. त्याला अंतर्गत गुणही आहेत. हा विषय अत्यंत महत्त्वाचा असून, या अंतर्गत विद्यार्थ्यांना वृक्ष लागवड आणि संवर्धन अनिवार्य केल्यास वनक्षेत्र वाढण्यास मोठी मदत होणार आहे. भावी पिढीलाही वृक्ष लागवड आणि संवर्धनाचे महत्त्व लक्षात येणे गरजेचे आहे. या अनुषंगाने वसुंधरा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा.योगेश शर्मा यांनी लातूर दौऱ्यावर असताना महामहीम राज्यपाल महोदयांची भेट घेऊन निवेदन दिले. महाराष्ट्र राज्यातील सर्वच विद्यापीठात विद्यार्थ्यांना वृक्ष लागवड आणि संवर्धन अनिवार्य करण्याची मागणी त्यांनी यावेळी राज्यपाल महोदयांकडे केली. याला राज्यपाल महोदयांनीही



सकारात्मक प्रतिसाद दिला. शिवाय, ३० ऑगस्ट 2022 रोजी नांदेड विद्यापीठाचे कुलगुरू यांनाही निवेदन देण्यात आले. या निवेदनाची दखल घेत विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा विभागाच्या वतीने 15 सप्टेंबर रोजी परिपत्रक काढून विद्यार्थ्यांना वृक्ष लागवड आणि संवर्धन अनिवार्य केले आहे. प्रति विद्यार्थी पाच वृक्ष लागवड करून संवर्धन केल्याशिवाय पदवी प्रमाणपत्र (डिग्री सर्टिफिकेट) दिले जाणार नाही, असे विद्यापीठाने काढलेल्या परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे. या निर्णयामुळे प्रा.योगेश शर्मा यांनी नांदेड विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ.मल्लिकार्जुन करजगी यांचे आभार मानले असून, या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना वृक्ष लागवड आणि संवर्धनाचे महत्त्व लक्षात येऊन हजारो झाडांचे संवर्धन होण्यास मदत होणार आहे.

नांदेड विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या चारही जिल्ह्यातील महाविद्यालयांना हा निर्णय लागू करण्यात आला आहे. या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास हजारो झाडांचे संवर्धन होण्यास मदत होणार आहे. निर्णय झाला असला तरी याची अंमलबजावणी करण्यासाठी काही गोष्टी होणे आवश्यक आहे. प्रत्येक महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग कार्यान्वित आहे. शिवाय, पर्यावरण विषय शिकविणारे प्राध्यापक आहेत. विद्यापीठाने परिपत्रक जारी करून प्रति विद्यार्थ्यांना प्रति वर्ष 5 झाडे लावावीत असे अनिवार्य केले आहे.

महाविद्यालयाने या संदर्भात एक विशेष यंत्रणा कार्यान्वित करून राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि पर्यावरण विषय प्राध्यापक यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी वृक्ष लागवड केल्याचे पुरावे घेऊन संवर्धन केल्याचाही अहवाल दर महिन्याला घ्यावा. किमान 1 वर्ष झाडाचे संगोपन केल्यास त्यानंतर ते झाड उत्तम वाढेल. त्यामुळे विद्यापीठाने परिपत्रक काढले असले तरी खरी कसोटी महाविद्यालय प्रशासन आणि विद्यार्थ्यांची असणार आहे.

### औरंगाबाद विद्यापीठानेही हा निर्णय घ्यावा : प्रा . योगेश शर्मा

औरंगाबाद विद्यापीठ अंतर्गत औरंगाबाद, उस्मानाबाद, बीड, जालना आदी जिल्ह्यांचा समावेश आहे . यात प्रामुख्याने बीड आणि उस्मानाबाद जिल्ह्यात वनांचे क्षेत्र इतर जिल्ह्यांच्या तुलनेत कमी आहे . नांदेड विद्यापीठाने ऐतिहासिक निर्णय घेत वृक्ष लागवड आणि संवर्धन ही विद्यार्थी चळवळ होण्यासाठी पुढाकार घेतला आहे . नांदेड विद्यापीठ प्रमाणे औरंगाबाद विद्यापीठानेही परिपत्रक काढून हा निर्णय लागू करावा, अशी मागणी स्वत : कुलगुरू महोदयांना भेटून करणार असल्याचे वसुंधरा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा .योगेश शर्मा यांनी सांगितले .



# नादातांडा येथे मुक्ती संग्राम दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील नादातांडा येथे ग्रामपंचायत कार्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने सरपंच मोरसिंग चव्हाण यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले तर जि.प.उच्च माध्यमिक शाळेत गावातील नायक हरलाल नायक यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. याप्रसंगी विविध सांस्कृतिक कार्यक्रम साजरा करण्यात आला. जि.प.उच्च प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना मिठाई वाटप करण्यात आली.यावेळी ग्रा.प.सदस्य वरदानसिंग चव्हाण यांनी थोडक्यात मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कुसुमाग्रजांच्या कवितेतील "एकच तारा समोर आणिक पायतळी अंगार" ही ओळ उद्घृत करुन वरदानसिंग चव्हाण म्हणाले, अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी अशा ध्येयधुंद भावनांनी हैद्राबाद मुक्ती लढ्यासाठी जीवाची बाजी लावुन तुरुंगवास भोगला, हौतात्म्यही पत्करले अशा सर्व ज्ञात- अज्ञात स्वातंत्र्य सेनानी आणि वीरांगणांना आदरांजली अर्पण करतो.

मराठवाडा मुक्तिसंग्राम हे आपल्या इतिहासातील देदीप्यमान पर्व होते. आजच्या पिढीला या इतिहासाची माहिती देणे काळाची गरज आहे. महाराष्ट्र, कर्नाटक आणि तेलंगणा या तीन राज्यांचा मिळून हैद्राबाद मुक्तिसंग्राम कार्यक्रम असणार आहे. हैद्राबाद संस्थानवर निजाम मीर उस्मान अली यांचे राज्य होते. त्यांच्या राजवटीतून मुक्त होवून भारतीय संघराज्यात सामील होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण हैद्राबाद संस्थानात मुक्तीसंग्राम सुरु झाला. या लढ्यात स्वामी रामानंद तीर्थ, दिगंबरराव बिंदु, गोविंदभाई श्रॉफ, रविनारायण रेड्डी, देवीसिंग चौहान, भाऊसाहेब वैशंपायन, विजयेंद्र काबरा, बाबासाहेब परांजपे या आणि इतर अनेक नेत्यांकडे होते.मराठवाड्याच्या गावागावात हा संग्राम लढला गेला. यात जीवाची पर्वा न करता अनेक स्वातंत्र्यवीर पुढे आले. मराठवाड्याची राणी लक्ष्मीबाई म्हणून प्रसिद्ध झालेल्या बदनापूर तालुक्यातील धोपटेश्वर गावच्या दगडाबाई शेळके यांच्यासारख्या अनेक महिलांच्या योगदानाची आज आठवण होते. या लढयातील सर्व हुतात्म्यांनी आणि मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांनी केलेल्या त्यागाचे मोल करणे शक्य नाही असेही वरदानसिंग म्हणाले. यावेळी सरपंच मोरसिंग चव्हाण, उपसरपंच, वरदानसिंग चव्हाण, गुरुमुख जाधव, ममराज जाधव, प्रकाश राठोड, ग्रामपंचायत सदस्य, मुख्यधापक, लालसिंग चव्हाण, जि.प. शाळेचे शिक्षकवृंद, ग्रा.प.कर्मचारी, विद्यार्थी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सृजन साहित्य संघाच्या सातव्या राज्यस्तरीय साहित्य संमेलनात साहित्यविषयक कार्यक्रमांची रेलचेल

आधुनिक केसरी न्यूज

**मूर्तिजापूर :** येथील सृजन साहित्य संघ या संस्थेचे सातवे राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन मूर्तिजापूर येथे रविवार दि.९ ऑक्टोबर - २०२२ ला सकाळी -९.००ते रात्री -८.०० पर्यंत, भक्तीधाम मंदिर सभागृह, भारतीय ज्ञानपीठ शाळेच्या मागे, समतानगर मूर्तिजापूर येथे आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनामध्ये उद्घाटन, पुस्तक प्रकाशन, वाटेवरती काचा ग! तृतीय पंथी व्यक्तीची भळभळतं जगणं उलगडणारी, संवेदनशील मुलाखत, प्रथमच साहित्य विचारपीठावर सादर होणार आहे . निमंत्रीत कविंच्या कवितांचे श्रवणीय कविसंमेलन, बहारदार गझल मुशायरा, शेती - मातीच्या व्यथेची उपायात्मक नोंद मराठी साहित्यात कितपत घेतल्या गेली? एक समयोचित परिसंवाद, व समारोप अशा साहित्यविषयक कार्य क्रमांची रेलचेल संमेलनात राहणार आहे. तेव्हा रसिक श्रोत्यांनी संमेलनात सहभागी होऊन कार्यक्रमाचा अवश्य आस्वाद घ्यावा असे आवाहन सृजन साहित्य संघाव्दारा करण्यात आले आहे. असे प्रसिद्ध प्रमुख विनोद महल्ले कळवितात .

# गौशाळेत प्राथमिक स्वरूपात लसीकरण मोहीम

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** हेडगेवार दवाखान्याच्या मागे गावडे यांच्या गौशाळेत प्राथमिक स्वरूपात लसीकरण मोहीम राबवण्यात आली. शहरात मोठ्या प्रमाणावर लसीकरण होण्यासाठी विधानसभा संघटक तथा मा.स्थायी समिती सभापती संभाजीनगर महानगरपालिका मा.श्री.रेणुकादास (राजु) भाऊ वैद्य जिल्हा पशु संवर्धन वैद्यकीय अधिकारी डॉ.वल्लभ जोशी यांच्याशी चर्चा करून शहरात मोठ्या प्रमाणात लसीकरण लवकरात लवकर करावे अशी सूचना केली. त्यानुसार डॉ. आकाश शिंदे यांनी याठिकाणी स्वतः भेट देऊन राजु वैद्य यांच्या उपस्थितीत लसीकरणास सुरवात केली.

शहरातील ज्या-ज्या भागात जनावरे आहेत त्यांच्या मालकांनी, त्या भागातील समाजसेवकांनी व नागरिकांनी स्वतः पुढाकार घेऊन लसीकरण करण्यासाठी प्रशासनास



मदत करावी असे अवाहन श्री.राजु वैद्य यांनी केले आहे.लसीकरणाबाबतीत कुठलीही तक्रार किंवा अडचण असल्यास पशु संवर्धन वैद्यकीय अधिकारी डॉ.वल्लभ जोशी, संपर्क - ८७६६४२१६४७ डॉ.आकाश शिंदे, संपर्क - ९३०९७१६८२३ यांच्याशी संपर्क साधावा असे राजू वैद्य यांनी कळविले आहे. यावेळी अखिल शेख, प्रकाश दुर्वे, राज नीळ, राम गावडे, अल्काबाई गावडे, संदीप अहिरे, बंटी कचकुरे आदींची उपस्थिती होती.

# ब्राह्मण महासंघाकडून गौरी गणपती स्पर्धेचे बक्षीस वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** प्रति वर्षीप्रमाणे या वर्षीही अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ औरंगाबादच्या वतीने गौरी गणपती स्पर्धा घेतली. या स्पर्धेचे रविवारी दुपारी बक्षीस वितरण कलश मंगल कार्यालय क्रांती चौक येथे करण्यात आले.

या वेळी प्रमुख पाहुणे रामचंद्र आंधानेरकर आणि दीपक कुलकर्णी होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष सुधीर नाईक उपस्थित होते.

आपली संस्कृती टिकवण्यासाठी तसेच महिलांना उत्तेजन मिळावे, महिलांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा. यासाठी असे सांस्कृतीक कार्यक्रम अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ घेत असतो असे जिल्हाध्यक्ष सुधीर नाईक यांनी यावेळी सांगितले.

तसेच नवरात्रात 3 दिवस दांडिया प्रशिक्षण व स्पर्धा ही घेणार असे महिला जिल्हाध्यक्ष सुचेता पालोदकर यांनी यावेळी सांगितले. प्रमुख अतिथीचे स्वागत स्मिता जोशी, संजय टोनपे ह्यांनी केले. या वेळी 80 स्पर्धक सहभागी झाले. त्या पैकी 10 स्पर्धकाना बक्षिस रुपी साडी देण्यात आली. तर उर्वरित सर्व सहभागिना प्रमाणपत्र देण्यात आले. प्रथम पारितोषिक मानाची साडी पैठण येथील यामिनी साळजोशी यांना लग्न विधी



देखावा, तर द्वितीय गौरी पिम्पले ह्यांचा लता मंगेशकर, तृतीय हर्षा कुलकर्णी, श्रीकृष्ण लीला चौथे अपर्णा याडकीकर, पाचवी अमृता मानवतकर, सहावी सीमा देशपांडे वैजापूर, सातवे अलका देशमुख, आठवे राधिका दैठणकर, नववे माधुरी पल्लेवार, दहावे सोनल कस्तूरे, पैठण यांना प्रदान करण्यात आल. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्मिता नगरकर, गायत्री न्यायाधीश, प्राजक्ता तांबोली, ॲड. अश्विनी कुलकर्णी, मीना महाजन, मयूरी जोशी, कुणाल वैद्य, आकाश हरसूलकर, संदीप बेदरकर, प्रशांत बक्षी, प्रशांत काटे, प्रकाश महाजन, कालिदास त्रिवेदी आदींनी परिश्रम घेतले.

# रोहडा तंटामुक्त अध्यक्षपदी आठव्यांदा हरिमकर अविरोध

आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** माळपठारावरील रोहडा येथील ग्रामसभेत म. गांधी तंटामुक्त गाव समितीच्या अध्यक्षपदी दिपक हरीमकर यांची आठव्यांदा अविरोध निवड झाली. ते दै. नवराष्ट्र वर्तमानपत्राचे प्रतिनिधी म्हणून काम पाहतात. तंटामुक्ती कामी त्यांना गावातील पोलिस पाटील राजकुमार पारीसकर, म. गांधी तंटामुक्त गाव समितीचे उपाध्यक्ष बबन ढोक मदत करतात. त्यांच्या या निवडीबदद्ल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



## टिसी हरवली

**चैतन्य राजेद्र मगर, रा. नावडी, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद** यांची टिसी प्रवासात गहाळ झाली असून कुणाला मिळाली तर 9325642817 या मोबाइल नंबरवर संपर्क साधावा.

# भूमिका स्पष्ट असेल तर वृत्तपत्रांना मरण नाही : प्रा. कांबळे

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** वर्तमान पत्राच्या संपादकाकडे चिकाटी व स्पष्ट लोकहितवादी वैचारिक भूमिका असेल तर वृत्तपत्रे बंद पडू शकत नाहीत. वैचारिक अधिष्ठाण मजबूत असेल तर वृत्तपत्राना मरण नाही असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत साहित्यिक, समीक्षक प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे यांनी समाजभूषण वितरण सोहळ्यात बोलताना केले. मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र सभागृहात शनिवारी निळे प्रतीक बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींना समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

या प्रसंगी प्रमुख वक्ते प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे बोलत होते कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रसिद्ध अस्थि रोगतज्ञ व विचारवंत डॉ. चंद्रकांत थोरात यांनी भूषवले. यावेळी विचारपीठावर, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शास्त्रज्ञ प्रॉपेसर डॉ.सिद्धार्थ जोंधळे, डॉ चंद्रकात थोरात, श्रावणदादा



गायकवाड, उमेश नागदेवे, भिखुनी प्रा. धम्मदर्शना महाथेरी, अनिलकुमार निंभोरे,अँड. धनंजय बोरडे,विनय घनबहादूर, नंदाताई गायकवाड,आदी मान्यवरांची उपस्थिती होती. आपल्या भाषणात प्रा.डॉ. ऋषिकेश कांबळे पुढे बोलताना म्हणाले की वृत्तपत्राची खरी ताकद काय असते हे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना ठाऊक होते. स्वराज्याची भूमिका मांडणारे लोकमान्य टिळकांच्या मनातून जात कधीच गेली नाही. महात्मा फुले यांचे निधन झाले तेव्हा टिळकांनी महात्मा फुले विषयी एक ओळही लिहिलेली नाही. याची सल बाबासाहेबांच्या मनात राहिली.१९२० साली मूकनायक हे वृत्तपत्र डॉ बाबासाहेब आंबेडकरानी सुरु केले. आणि याच वर्षात टिळकाचे निधन झाले. तेव्हा पुण्याचे टिळक गेले एवढी एकच ओळ छापून टिळकांचा वचपा काढला. वृत्तपत्रात किती ताकद आहे. ते बाबासाहेबांनी दाखवून दिले . पुढे बोलताना प्रा.डॉ. ऋषिकेश कांबळे यांनी नमूद केले की प्रतिकूल परिस्थितीत असताना देखील निळे प्रतीक हे वृत्तपत्र गेली बारा वर्षे सुरू आहे. कारण स्पष्ट भूमिका हे या वृत्तपत्राचे वैशिष्ट्य आहे. हे वृत्तपत्र साप्ताहिक स्वरूपात असले तरी या वृत्तपत्राचे रूपांतर आता दैनिकात व्हावे. अशी अपेक्षा प्रा. डॉ.कांबळे यांनी व्यक्त केली.

उद्‌घाटनपर भाषणात तंत्रशिक्षण विभागाचे सहसंचालक उमेश नागदेवे म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी रिझर्वेशन दिले त्यामुळे आपल्या समाजातून अनेक अधिकारी निर्माण झाले. डॉ बाबासाहेबांचे हे योगदान विसरता येण्यासारखे नाही. आज नोकऱ्या कमी होत आहेत,रिझर्वेशन हे हळूहळू कमी होत आहे. त्यासाठी सोशल मोमेंट उभी करावी लागेल. असे नमूद करून नागदेवे म्हणाले की डॉ.बाबासाहेब आंबेडकराना लोक घाबरायचे यामागील सत्य बाबासाहेबांच्या जीवनातील महत्त्वाचा भाग आहे. कठोर शील संवर्धन व कुठेही न झुकण्याची, न विकण्याची प्रवृत्ती, यामुळे बाबासाहेब महान ठरलेले आहेत. निळे प्रतीक हे दैनिक व्हावे.अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

आंबेडकरी चळवळीतील श्रावण गायकवाड यांनी आपल्या तडाखेबंद भाषणातुन सभागृहात सर्वांचे लक्ष वेधून घेतले.जातीअंताची चळवळ व ध्यास सर्वात महत्त्वाचा असल्याचे त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले. संपादक रतनकुमार साळवे यांनी मागील बारा वर्षाच्या वाटचालीचा आढावा घेतला. कार्यकारी अभियंता अनिल कुमार निंभोरे, त्रीनिती बोर्ड युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. सिद्धार्थ जोंधळे अँड.धनंजय बोरडे,नंदाताई गायकवाड आदीं मान्यवराची यावेळी भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंकज शिंदे यांनी केले. या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ पत्रकार स. सो.खंडाळकर, रतनकुमार पंडागळे, व्ही के वाघ, एस आर. बोदडे,पत्रकार ज्ञानेश्वर खंदारे, बाबुराव जुमडे, राहुल साळवे, डॉ. प्रवीण रणवीर,शांतीलाल दाभाडे आदी अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. वंचित बहुजन आघाडीचे नेते अमित भुईगळ,मुकुंद दादा सोनवणे,डॉ.चंद्रकांत थोरात विनायक घनबहादूर, डॉ.रोहिणी साळवे, ज्योत्स्नाताई कांबळे, प्राचार्य हसण इनामदार आदी २६ जणांना समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रतीक साळवे, राहुल गवळी, संकेत साळवे, प्रवीण बनकर, अमोल खरात, राजेंद्र हिवरे आदींनी परिश्रम घेतले या कार्यक्रमाचे आभार राहुल साळवे यांनी मानले.या कार्यक्रमात मोठ्या संख्येने नागरिकांनी गर्दी केली होती.




## पैठण तालुका इलेक्ट्रीक मोटार रिवाइंडिंग व पंप रिपेअरिंग संघटनेची वार्षिक सभा

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** येथील अभिनंदन मंगल कार्यालयात प्रथमच इलेक्ट्रीक मोटार व रिपेअरींग संघटनाची पहीली वार्षिक सभा पार पडली.
कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर उगले, (तालुकाध्यक्ष व्यापारी महासंघ ) प्रमुख मार्गदर्शनक प्रा.संतोष तांबे (संपादक दखनी स्वराज्य) प्रमुख अतिथी पवनशेठ लोहीया,शहराध्यक्ष व्यापारी महासंघ ,रामेश्वर सुसे,तालुका सचिव,अँड रमेश गव्हाणे,यांची उपस्थिती होती.यावेळी प्रा.संतोष तांबे यानी संघटना मजबूत करणे,संघटनेच्या सदस्य अथवा काम करताना कामगाराचा अपघात झाला तर विम्याचे सुरक्षा कवच कसे द्यावे, पैशाची बचत तसेच विविध विषयावर मार्गदर्शन केले. तर पैठण तालुका व शहर व्यापारी संघटना तुमच्या सदैव पाठीशी उभी राहील असे ज्ञानेश्वर उगले,पवन लोहीया यानी आपल्या मनोगतातुन व्यक्त केले,तसेच नव्याने कामगाराचे संघटन होत असलेल्या पदाधिकारी व सदस्यांचे तालुका व्यापारी महासंघाचे सचिव रामेश्वर सुसे यांनी स्वागत केले. यावेळी संस्थापक अध्यक्ष शरद भागवत, महादेव वडेकर,तुकाराम चव्हाण, विजय कडोस,तसेच तालुक्यातील इलेक्ट्रीक मोटार रिवायडींग व पंप रिपेअरींग करणार्या सदस्याची उपस्थिती होती.

## लोणार न. प.चा "इंडियन स्वच्छता लीग" स्पर्धेत सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत १७ सप्टेंबर २०२२ ते २ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत "स्वच्छ अमृत महोत्सव" राबविले जात आहे. केंद्र शासनाने देश पातळीवर " इंडियन स्वच्छता लीग " स्पर्धेचे आयोजन केले आहे. या लीग मध्ये लोणार शहर सहभागी होत आहेत. लोणार शहराची टीमचे नाव "मी लोणारकर" आहे. त्यानुषंगाने आज दि.१७ सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी ९.००



वाजता लोणार सरोवर परिसर व गोमुख धार परिसर या दोन ठिकाणी स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. यावेळी न. प. उपाध्यक्ष बादशाह खान, शिवसेना जिल्हाप्रमुख प्रा. बळीराम मापारी, लोणार काँग्रेसचे जेष्ठ नेते साहेबराव पाटोळे, लोणार न. प. काँग्रेस गट नेते भूषण मापारी, नगरसेवक संतोष मापारी, नगरसेवक कंकाळ सर, प्रकाश सानप, मनीष पाटोळे, न. प. अभियंता अजय हडोळे, अनवर शाह, सुजित चव्हाण, मनोज सरदार, अशोक नीचंग, अशोक शर्मा, कैलाश नेवरे, अथर अली, याह्या खान, सचिन कापुरे, विलास जाधव, सचिन मस्के, विनय कुलकर्णी, रोहन सोसे, गजानन घोडके, रमेश राठोड, कैलास चौधरी, उबेद खान व इतर हजर होते.

## बदलत्या उपचारपद्धतींशी जुळवून घेणे महत्त्वाचे : डॉ. एम.एम.मुथ्थुसेतुपती

### मूत्रविकारतज्ज्ञांच्या परिषदेची सांगता, चारशेच्यावर डॉक्टरांचा सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** नेफ्रॉलॉजिच्या क्षेत्रात झपाट्याने बदल होत आहेत. नवनवीन उपचार पध्दती पुढे येत असून त्याच्याशी डॉक्टरांनी जुळवून घेणे गरजेचे आहे असे आवाहन ज्येष्ठ नेफ्रॉलॉजिस्ट डॉ. एम.एम.मुथ्थुसेतुपती यांनी केले. इंडियन सोसायटी ऑफ नेफ्रॉलॉजिस्ट अर्थात मुत्रविकारतज्ज्ञांच्या पश्चिम विभागीय संघटनेच्या वार्षिक परिषदेच्या सांगता प्रसंगी डॉ. व्ही. एन.आचार्य मागर्दशन सत्रात बोलत होते. नेफ्रॉलॉजिच्या क्षेत्रात चाळीस वर्षे प्रॅक्टिस झालेले डॉ. एम.एम.मुथ्थुसेतुपती यांचे मार्गदर्शन आणि अनुभव कथन परिषदेच्या सांगता दिनाचे खास आकर्षण होते.




डॉ. एम.एम.मुथ्थुसेतुपती यांनी मागील चाळीस वर्षात वैद्यकीय क्षेत्राच्या या शाखेत कसे कसे बदल होत गेले याचा आढावा घेतला तसेच त्यांचे अनुभव सांगताना काही महत्वाच्या रुग्णाच्या उपचाराचा लेखाजोखा मांडला. नव्या उपचार पध्दतींबरोबर प्रत्येक डॉक्टराने जुळवून घेतले पाहिजे तसेच त्याचा उपयोग जास्तीत जास्त रुग्णांना करुन द्या असे आवाहन त्यांनी केले.

तीन दिवस सुरु असलेल्या परिषदेत नेफ्रॉलॉजि क्षेत्राशी संबधित प्रत्येक व्यावसायिकांसाठी कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. काल पार पडलेल्या किडनी आजार आणि आहार संबंधित कार्यशाळेत सत्तरच्यावर आहारतज्ज्ञ सहभागी झाले होते. किडनीच्या आजाराचे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांबरोबर यावेळी संवाद साधण्यात आला. फिजीशियनसाठीच्या कार्यशाळेत शंभरच्यावर , डायलिसीस टेक्निशियन कार्यशाळेत ८५ तज्ज्ञ सहभागी झाले होते. ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेटरच्या कार्यशाळेचा १५ जणांनी लाभ घेतला. मुख्य परिषदेत २४० नेफ्रॉलॉजिस्टने सहभाग नोंदवला अशी माहिती आयोजकांनी दिली. पदव्युत्तरच्या विद्यार्थ्यासाठी आयोजित नेफ्रॉलॉजि की अदालत ही प्रश्नमंजुषा स्पर्धा, नेफ्रॉलॉजि प्रिमियर लिग ही वाद विवाद स्पर्धा चांगलीच रंगली. महाराष्ट्र, गुजरात, गोवा, मध्यप्रदेश आणि छत्तीसगड येथील नेफ्रॉलॉजिस्ट परिषदेत सहभागी झाले होते. औरंगाबाद नेफ्रॉलॉजि सोसायटीचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ मुत्रविकारतज्ज्ञ, प्रमुख मार्गदर्शक डॉ. सुधीर कुलकर्णी, तसेच सचिव डॉ. प्रशांत पारगावकर, डॉ. सुहास बावीकर, डॉ.उल्हास कोंडपल्ले यांच्या मार्गदर्शन हेही या परिषदेचे आकर्षण होते.

परिषद यशस्वी करण्यासाठी आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. श्रीगणेश बर्नाला, सचिव डॉ. सचिन सोनी, सहसचिव डॉ.क्षितीजा गाडेकर, डॉ. शेखर शिराढोणकर,डॉ. समीर महाजन, डॉ. श्रीकांत देशमुख, डॉ.निरज इनामदार, डॉ. प्रदीप सारुक, डॉ. वाजेद मोगल, डॉ. राहुल रुईकर, डॉ. पंकज भन्साली यांनी परिश्रम घेतले.

**सर्वांना समावून घेण्याचा प्रयत्न- डॉ . सचिन सोनी**

नेफ्रॉलॉजि संबंधित विविध तज्ज्ञांचा सहभाग रुग्णांच्या उपचारात असतो . त्यामुळे या क्षेत्राशी संबधित प्रत्येकाला परिषदेत सामावून घेण्याचा आणि त्यांनाही काही ना काही देण्याचा प्रयत्न या परिषदेच्या माध्यमातून केला .कार्यशाळांना मिळालेला प्रतिसाद पाहता हा प्रयत्न यशस्वी झाल्याचे समाधान वाटते असे आयोजन समितीचे सचिव डॉ . सचिन सोनी यांनी सांगितले . परिषद यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतलेल्यांचे त्यांनी आभार मानले .

# श्रीयश प्रतिष्ठानतर्फे विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य भाजप प्रदेश उपाध्यक्ष बसवराज मंगरूळे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विविध सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला विशेष पाहुणे म्हणून श्रीयश प्रतिष्ठानचे सी.ई.ओ. कर्नल जॉय डॅनियल उपस्थित होते, कोविडच्या काळामधील रक्ताचे महत्व पाहता रक्त दान हे सर्वश्रेष्ट दान आहे हे लक्षात घेऊन भव्य रक्तदान करण्यात आले, त्यामध्ये मोठ्याप्रमाणात महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा मोठ्याप्रमाणात सहभाग होता. तसेच औरंगाबाद महानगरपालिका आरोग्य विभाग व श्रीयश प्रतिष्ठान यांच्या संयुक्तविद्यमाने भव्य कोविड लसीकरण शिबीर घेण्यात आले. यामध्ये पहिला, दुसरा व बुस्टर डोस असे तिन्ही डोस देण्यात आले. यामध्ये मोठ्याप्रमाणात महाविद्यालयातील विध्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी लसीकरणाचा लाभ घेतला व निसर्गाची देण म्हणून संस्थेच्या परिसरामध्ये भव्य असे वृक्षारोपन करण्यात आले.

या कार्यक्रमानंतर शिक्षकदिन सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसोबत साजरा करण्यात आला यामध्ये उत्कृष्ट कामगिरीबद्दल शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संचालक प्रभाकर माशाळकर, प्राचार्य डॉ. बी.एम. पाटील, प्राचार्य डॉ. जी.जी. तापडिया, उपप्राचार्या स्मिता जोशी, उपप्राचार्य एस. डी. भोपळे आदी उपस्थित होते. या सामाजिक कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय छात्र सेना अधिकारी प्रा. दत्ता खाडे, प्रा. हर्षल चोथे, प्रा. किशन जैस्वाल, डॉ. मसर्रत सुलताना, प्रा. मीनल चौधरी, प्रा. ब्रिजभूषण शुक्ला, सचिन दाभाडे व राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.



# अवैध खडी क्रशरवर जिल्हा खनिकर्म पथकाची धडक कारवाई

## धारणगाव वीर : स्थानिक महसूल अधिकारी - कर्मचारी संशयाच्या भोवऱ्यात

आधुनिक केसरी न्यूज

**शिरवाडे वाकद :** अवैध गौणखनिज उत्खनन आणि वाहतूकीबाबत जिल्हा खनिकर्म प्रशासनाने निफाड तालुक्यात कारवाईचा बडगा उगारला आहे. त्यांच्या कार्यवाहीने गौण खनिज उत्खनन कारणारांचे धाबे दणालले असून स्थानिक महसूल प्रशासन मात्र संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे.

निफाड तालुक्यातील धारणगांव वीर येथे गेल्या कित्येक दिवसांपासून अवैध गौण खनिज उत्खनन सुरू होते. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार आलेली होती. या तक्रारीची दखल घेऊन जिल्हाधिकारी गंगाथरण डी.यांनी जिल्हा खनिकर्म अधिकारी रोहिणी चव्हाण यांना चौकशी करण्याचे आदेश दिले होते. या कार्यवाही बाबत चव्हाण यांच्या पथकाने अत्यंत गुप्तता पाळली.

स्थानिक महसूल प्रशासनाला कुणकुण लागू न देता धारणगाव वीर येथील बन्सीलाल नारायण कुमावत यांच्या मालकीच्या ७०/२ या गट नंबरला भेट दिली. त्याठिकाणी अवैध उत्खनन चालू असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. सदर ठिकाणाहुन सुमारे १०० ब्रास दगड, ५० ब्रास खडी उत्खनन केल्याचे दिसून आले. या उत्खननासाठी संबंधित क्षेत्र बिगर शेती केले नाही, प्रदूषण नियंत्रण महामंडळ, हरीत लवाद, मा.जिल्हाधिकारी नाशिक यांची परवानगी नव्हती किंवा स्थानिक ग्रामपंचायतचे कोणतेही ना हरकत प्रमाणपत्र किंवा ग्रामसभेचा ठराव नसताना राजरोस बेकायदेशीररीत्या उभा डोंगर फोडून निसर्गाचा विध्वंस सुरू होता. त्यामुळे खडी क्रशरचे पाच बेल्ट, १ क्रेशर मशीन, १ लोखंडी साठा असे साहित्य जप्त करण्यात येऊन कुमावत यांना १८ लाख ४० हजार ८५० /- इतका दंड करण्यात आला असून खडी क्रशर सील करण्यात आले आहे. स्थानिक तलाठी गणेश जगताप, मंडळ अधिकारी पी. पी. केवारे यांच्या ताब्यात सदर साहित्य देण्यात आले आहे. जिल्हा खनिकर्म अधिकारी पथकाची निफाड तालुक्यातील ही सर्वात मोठी कार्यवाही असून त्यामुळे अवैध उत्खनन करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे. मात्र या कार्यवाहीचे निफाड तालुक्यातील नागरिकांनी जोरदार स्वागत केले आहे.



आपल्या अधिकार क्षेत्रात मोठ्या प्रमाणवर अवैध उत्खनन सुरू असून अवजड डंपर यांची वर्दळ असतांना याबाबत स्थानिक प्रशासन अनभिज्ञ होते. जिल्हा खनिकर्म अधिकारी नाशिक येथून भेट देऊन अवैध उत्खनन करणाऱ्या खडी क्रशरवर कारवाई करत असतील तर तलाठी आणि मंडळ अधिकारी हे स्थानिक महसूल अधिकारी काय काम करतात ? असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. याबाबत संबंधित अधिकारी 'अर्थपूर्ण' दुर्लक्ष करत असल्याची नागरिकांची शंका असून मंडळ अधिकारी आणि तलाठी यांना जिल्हाधिकाऱ्यांनी जबाबदार धरून चौकशी करण्याची मागणी केली आहे.

दरम्यान या कार्यवाहीचा पंचनामा दै.आधुनिक केसरी च्या हाती लागला असून काही जप्त साहित्य कमी असल्याचा नागरिकांना संशय आहे. संबंधित क्रशर हे पूर्णतः बेकायदेशीर असल्याचे आढळून आले असतांना वीज वितरण कंपनीने त्यांना एक्सप्रेस लाईन पुरवल्याचे निदर्शनास आले आहे. एकूणच संपूर्ण प्रकरण हे संशयास्पद असून खुद्द जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणाची चौकशी करावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# अ.भा.वि.प.चे अंबाजोगाई बस आगारमध्ये आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) शैक्षणिक क्षेत्रातील विविध विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी तत्पर असते. अंबाजोगाई शहरात ग्रामीण भागातुन शिक्षण घेण्यासाठी शेकडो विद्यार्थी प्रवास करत असतात. आज या विद्यार्थ्यांच्या बस संबंधित समस्यांना घेऊन अंबाजोगाई येथील बस आगारात जाऊन शहरात शिक्षण घेण्यासाठी येत असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवासाठी होत असलेल्या नाहक त्रासा बाबत आज अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने यशस्वी आंदोलन करण्यात आले.

यामध्ये प्रामुख्याने जवळगाव, लिंबगाव, सारे, गित्ता, दस्तगीरवाडी वरून येणारी बस अंबाजोगाई मध्ये



शाळा-महाविद्यालयीन वेळेपेक्षा उशिरा पोहचत असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणीक नुकसान होत आहे. त्याचप्रमाणे भारज पाटी या ठिकाणी बस चा थांबा नसल्याने आणि अंबाजोगाई ते मोटेगाव असणारी बस पुढे तीन (३) कि.मी भोकरंबा येथे जात नसल्याने विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आपल्या बसच्या गैरसोयीमुळे आपल्या शैक्षणिक नुकसानीस सामोरे जावे लागत आहे. अशा तीन मागण्यांना घेऊन आगार प्रमुख यांच्या दालनासमोर अभाविपने आंदोलन करत आगार प्रमुख श्री.नवनाथ चौरे यांना निवेदन देऊन वरील सर्व मागण्या मान्य करून घेतल्या. यावेळी अभाविपचे प्रदेशाचे सहमंत्री सुरज पावसे व शहरमंत्री दिपक उखंडे, तनिष श्रोत्रे, पुजा शिंदे, महेंद्र उजगरे यांच्यासह अभाविप कार्यकर्ते व ग्रामीण भागातुन प्रवास करणारे विद्यार्थी-विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अंबाजोगाई बस आगार प्रमुख श्री. नवनाथ चौरे यांनी विद्यार्थ्यांची बाजु ऐकून आणि शिक्षक-प्राध्यापकांचे म्हणणे समजून घेऊन कनिष्ठ कर्मचारी यांच्या कडून पुर्वीच्या मागणीचा आणि चालु असलेल्या बसच्या वेळेचा सहकारी पल्लेवाड यांच्याकडून आढावा घेत लागलीच विद्यार्थ्यांच्या मागणीची दखल घेऊन पुर्ततेसाठी आदेश दिले. तेंव्हा येणाऱ्या दोन-तीन दिवसात सारे चित्र लक्षात येईल.



# क्रांतिकारकांचे मराठवाडा मुक्ती लढ्यातील योगदान श्रेष्ठ : झरीकर

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** अखिल भारतीय इतिहास संकलन योजना दिल्ली संलग्न इतिहास संकलन संस्था महाराष्ट्र प्रांत वतीने आँनलाईन गुगल मीट लिंकद्वारा मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त व्याख्यान आयोजन करण्यात आले. प्रा. रविसातभाई यानी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना स्पष्ट केले मराठवाडा मुक्ती संग्राम दिन 74 वर्ष पूर्ण होवुन अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण करत आहोत. निजामी राजवटीविरुध्द मराठवाड्यातील जनतेने लढा दिला यातील विरांना अभिवादन करण्याचा हा दिन होय. प्रमुख वक्ते नंदकिशोर झरीकर - यानी सांगीतले की , मुक्तीदिन साजरा करतो का? का करावा असे अनेक प्रश्न पडतात. स्वातंत्र्य मिळवण्यास अनेकांनी त्याग केला बलिदान केले.

या लढ्याचे नेतृत्व स्वामी रामानंदतीर्थ ,काब्राजी दगडाबाई शेळके इ. केले भारतात संस्थानानी विलीन होण्यास नकार दिला. यात नकार देणारे संस्थान जुनागढ, हैद्राबाद, जम्मुकाश्मीर ही संस्थाने स्वतंत्र भारतात विलीन करण्यासाठी जनतेने लढा दिला. सरदार वल्लभभाई पटेल कठोर आक्रमक भूमिका महत्वाची आहे. हैद्राबाद संस्थानात पारतंत्र्यातुन मुक्त होणेसाठी जनतेने गावा - गावात लढे सुरु झाले. 17/9/ 1948 रोजी हैद्राबाद संस्थान भारतात विलीन झाले.

मराठवाडा मुक्तीसंग्राम लढा सुरू झाला कासीम रझवीने रझाकार संघटने द्वारा जनतेवर अन्याय अत्याचार जुलुम करत असे. या कृत्ती विरुद्ध गावामध्ये मराठवाड्यातील जनतेने करत . प्राणपणाने लढा दिला. निजामाचा हेतु साध्य होऊ दिला नाही. काशीनाथ जाधव, काटकर जर्नादन होर्टीकर , सूर्यभान पवार विनायक चारढाणकर, वाघमारे. पराजंपे इ. यात योगदान दिले. गृहमंत्री-सरदार वल्लभभाई पटेल यानी पोलीस कारवाई निजामाविरुध्दर केली. 13सप्टे 17 सप्टे 1948 निजाम शरण आला. मराठवाडा स्वतंत्र भारतात विलीन झाला. अध्यक्षीय समारोप करताना उदय पाठक यानी सांगीतले कु ब्रीटीशांनी भारतात स्वातंत्र सहजह दिले नाही भारताची फाळणी केली. संस्थानाना विशेष अधिकार दिले.

# मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी स्वातंत्र्य सैनिक पत्नींचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** आज अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय तथा मेडिकल कॉलेज परिसरातील दे.बा.गणगे.यो.नू. वि.प्रा.वि.मेडिकल शाळेत स्वातंत्र्य सैनिक श्री. प्रभाकररावजी रामपुरकर यांच्या पत्नी श्रीमती.प्रतिभाताई रामपूरकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

तसेच ऐतिहासिक शहाबुरुज येथे मराठवाडा जनता विकास परिषदेच्या वतीने स्वातंत्र्य सैनिक स्व.वामनरावजी ठाकुर यांच्या पत्नी श्रीमती. प्रतिभाताई वामनराव ठाकूर यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. अशाप्रकारे मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचे औचित्य साधून अंबानगरीत स्वातंत्र्य सैनिक पत्नींचा यथोचित सन्मान करुन त्यांच्या हस्ते ध्वजारोहणही करण्यात आले.



# सावळदबारा जि. प. मराठी शाळेत मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मराठवाडा मुक्ती संग्राम दिना निमित्त प्रथम राष्टपिता महात्मा गांधी व सरदार वल्लभभाई पटेल यांच्या केंद्र प्रमुख एम.डी.सोनवणे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रीपळ फोडून ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी विविध सांस्कृतिक कार्यक्रम साजरा करण्यात आला.

जि.प.उच्च प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना मिठाई वाटप करण्यात आली.यावेळी शिक्षक भागवत गायकवाड यांनी थोडक्यात मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कुसुमाग्रजांच्या कवितेतील "एकच तारा समोर आणिक पायतळी अंगार" ही ओळ उद्घृत करुन गायकवाड म्हणाले, अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी अशा ध्येयधुंद भावनांनी हैद्राबाद मुक्ती लढ्यासाठी जीवाची बाजी लावुन तुरुंगवास भोगला, हौतात्म्यही पत्करले अशा सर्व ज्ञात- अज्ञात स्वातंत्र्य सेनानी आणि वीरांगणांना आदरांजली अर्पण करतो. मराठवाडा मुक्तिसंग्राम हे आपल्या इतिहासातील देदीप्यमान पर्व होते. आजच्या पिढीला या इतिहासाची माहिती देणे काळाची गरज आहे.

महाराष्ट्र, कर्नाटक आणि तेलंगणा या तीन राज्यांचा मिळून हैद्राबाद मुक्तिसंग्राम कार्यक्रम असणार आहे. हैद्राबाद संस्थानवर निजाम मीर उस्मान अली यांचे राज्य होते. त्यांच्या राजवटीतून मुक्त होवून भारतीय संघराज्यात सामील होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण हैद्राबाद संस्थानात मुक्तीसंग्राम सुरु झाला. या लढ्यात स्वामी रामानंद तीर्थ, दिगंबरराव बिंदु, गोविंदभाई श्रॉफ, रविनारायण रेड्डी, देवीसिंग चौहान, भाऊसाहेब वैशंपायन, विजयेंद्र काबरा, बाबासाहेब परांजपे या आणि इतर अनेक नेत्यांकडे होते.मराठवाड्याच्या गावागावात हा संग्राम लढला गेला. यात जीवाची पर्वा न करता अनेक स्वातंत्र्यवीर पुढे आले. मराठवाड्याची राणी लक्ष्मीबाई म्हणून प्रसिद्ध झालेल्या बदनापूर तालुक्यातील धोपटेश्वर गावच्या दगडाबाई शेळके यांच्यासारख्या अनेक महिलांच्या योगदानाची आज आठवण होते. या लढयातील सर्व हुतात्म्यांनी आणि मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांनी केलेल्या त्यागाचे मोल करणे शक्य नाही असेही भागवत गायकवाड म्हणाले. यावेळी जि.प.शाळेचे केंद्रप्रमुख एम.डी.सोनवणे, भागवत गायकवाड, सतीश ढोणे, निता हिरास मँडम, गवयीसर,शाळेय व्यास्थापन अध्यक्ष सुपडा तडवी, शिक्षकवृंद,विद्यार्थी,अंगणवाडी सेविका व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# आ. बंब यांच्या प्रयत्नाने गंगापूर - खुलताबाद तालुक्यातील शाळा डिजिटल

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** आमदार प्रशांत बंब यांच्या प्रयत्नाने शालेय शिक्षण विभागाच्या समग्र शिक्षा योजनेअंतर्गत गंगापूर तालुक्यातील भिव-धानोरा, तुर्काबाद खराडीच्या जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत तसेच गंगापूर शहरातील अनुदानित धुत कन्या विद्यालय व खुलताबाद तालुक्यातील जनार्धन स्वामी आश्रम विद्यालय येथे प्रत्येकी 6 लाख 40 हजार रुपयांच्या अद्यावत संगणक प्रयोग शाळा या शाळांमध्ये देण्यात आल्या आहेत. यामध्ये संगणक, प्रोजेक्टर, वेब कॅम, इन्व्हर्टर, प्रिंटर तसेच फर्निचर, लाईट फिटिंग इ. साहित्याचा समावेश आहे. मतदार संघातील जिल्हा परिषदच्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता कशी वाढेल, त्यांना संगणकाचे ज्ञान कसे मिळेल या हेतूने गंगापूर खुलताबाद मतदार संघाचे आमदार प्रशांत बंब यांनी शासन दरबारी पाठपुरावा करून समग्र शिक्षा योजनेअंतर्गत या प्रयोगशाळा मंजूर करून घेतल्या.

सध्या हे संगणक साहित्य मंजूर असलेल्या त्या त्या शाळेवर आले असून लवकरचया प्रयोगशाळा सुरू होऊन मुलांना संगणकाचे ज्ञान मिळणार आहे. शासनाच्या समग्र शिक्षा अंतर्गत आयसीटी संगणक प्रयोगशाळा मंजूर करण्यात आल्या होत्या यात संगणकासह, प्रिंटर प्रोजेक्टर, वेब कॅम फर्निचर अशी अद्यावत प्रयोगशाळा असून या माध्यमातून जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांना तसेच दोन खाजगी शाळांना संगणकाचे परिपूर्ण ज्ञान मिळणार आहे. मार्च 2021 पासून या प्रयोगशाळा चे काम प्रगतीपथावर होते आता या प्रयोगशाळांची स्थापना झाली असून लवकरच गंगापूर खुलताबाद मतदार संघाचे आमदार प्रशांत बंब यांच्या हस्ते या अध्ययवत संगणक प्रयोगशाळांचे उद्घाटन होणार असून यानंतर विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान देखील मिळणार आहे. यामुळे पालकात समाधानाचे वातावरण आहे.



समग्र शिक्षा योजनेअंतर्गत गंगापूर व खुलताबाद जिल्हा परिषदेच्या शाळांसह दोन खाजगी शाळेत हे संगणक प्रयोग शाळा साहित्य देण्यात आले . त्यात 10 संगणक, एक प्रिंटर, एक वेब कॅम, इन्व्हर्टर, फर्निचर लाईट फिटिंग असे एकूण 6 लाख 40 हजार रुपयां इत्यादी साहित्य देण्यात आले आहे .

समग्र शिक्षा अभियानांतर्गत आमच्या शाळेवर संगणक, प्रिंटर, प्रोजेक्टर, वेब कॅम, इन्व्हर्टर तसेच फर्निचर घेण्यासाठी 20 हजार रुपये आलेले आहेत . शाळेत सर्व संगणकाचे इन्स्टॉलेशन पूर्ण झाले असून विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक देखील सुरू झाले आहे .
**एस . व्ही . गायकवाड, मुख्याध्यापक जिल्हा परिषद प्रशाला तुर्काबाद .**

आमदार प्रशांत बंब साहेबांनी वेळोवेळी जिल्हा परिषेदेच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्ते बाबतचा विषय उचलून त्या विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा प्रयत्न केला आहे . आमच्या गावात पुन्हा त्यांनी संगणक प्रयोग शाळा मंजूर करून देत आमच्याही विद्यार्थ्यांना खाजगी शाळे प्रमाणे परिपूर्ण शिक्षण देण्यासाठी सतत प्रयत्न करत आहे . याबद्दल समाधानी आहे .
**अजीम पटेल, पालक तुर्काबाद .**

# आदिवासी समाजाचा वाढोणा येथे जनजागृती मेळावा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील वाढोणा येथे दि.१८/९/२२ रोजी महाराष्ट्र एकलव्य आदिवासी विकास परिषद तर्फे आदिवासी समाजाचा जनजागृति मेळावा घेण्यात आला या जनजागृति मेळाव्या मधे संघटनेचे वरिष्ठ अधीकारी यांनी आदिवासी बंधु भगिनींना मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या शेवट चे भाषन महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अफसर तडवी यांनी केले आणि आदिवासी समाजाला मोठे मोलाचे मार्गदर्शन केले या कार्यक्रमादरम्यान वाढोणा येथील इसराईल तडवी यांची जालना जिल्हा अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आणि त्यांना नियुक्ती पत्र देऊन त्यांच अभिनंदन करुन स्वागत करण्यात आलं व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

या कार्यक्रमा दरम्यान प्रदेश अध्यक्ष अफसर तडवी , प्रदेश कार्य अध्यक्ष जब्बार तडवी, औरंगाबाद जि. अध्यक्ष नजीर तडवी, प्रदेश सल्लागार समिर तडवी, इसराईल तडवी जालना जिल्हा अध्यक्ष, सलाउद्दिन तडवी सिल्लोड तालुका अध्यक्ष, इरफान तडवी जळकी बाजार मराठवाडा संघटक, इकबाल तडवी सिल्लोड तालुका अध्यक्ष शहर, सलीम तडवी, शब्बीर तडवी, अलाउद्दी तडवी, चिंधु तडवी, शपीक तडवी, समिर तडवी, हुसेन तडवी, इकबाल तडवी जामठी, मसेरखा तडवी, युनुस तडवी, चांद तडवी, रफीक तडवी, नगिनाबाई तडवी, महीला जिल्हा अध्यक्षा जालना, बिबीबाई तडवी, शबाना तडवी, रुकसाना तडवी, दगडाबाई तडवी, राशद तडवी, ईरशाद तडवी, वंदना तडवी, असे अनेक महाराष्ट्र एकलव्य आदिवासी विकास परिषद चे पदाधीकारी कार्यकर्ते आणि आदिवासी बंधु भगीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# आमदार, खासदार वाढदिवसात व्यस्त! शेतकरी पावसामुळे त्रस्त

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तालुक्यासह जिल्ह्यात मुसळधार पावसाची हजेरी लावली आहे सतत च्या पावसाने पिकांचा मोट्या प्रमाणात नुकसान केल आहे यामुळे शेतकरी पूर्णतः हवादिल असल्याचे पहावयास मिळत आहे.

एकीकडे शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रूंचा बांध फुटला असून दुसरीकडे धुळ्यातील आमदार खासदार मात्र वाढदिवस साजरा करण्यामध्ये व्यस्त असल्याचं चित्र पहा अभ्यास मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची समस्या ही रामभरोसे असल्याचाही ऐकिवात येत आहे.

बोरी परिसरात पावसामुळे कापशी मका बाजरी मूग उडीद मिरची या पिकामध्ये पाणी साचल्याने उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता शेतकार्यामधून व्यक्त होत आहे.गेल्या चार ते पाच दिवसापासून परिसरात दिवस रात्र पाऊस सुरू असल्यामुळे जमिनी मध्ये संपूर्णपणे ओल कायम आहे. तांडा कुंडाणे,कुंडाणे, वेल्हाणे,हडसुने आदी गावात सतत पाऊस पडत आहे.या पावसाने बहरलेले पिकामध्ये पाणी साचले आहे पावसाचे पाणी जमित मुरत नसल्यानेपिके पिवळी पडू लागली आहे आतापर्यंत झालेल्या सततच्या पावसाने मिरची पिके खराब झाली आहे. यामुळे शेतकरी चिंतातूर झाला आहे. उत्पादन घटनेची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे प्रशासनाने नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करण्याची मागणी केली आहे.

# मातंग समाजावरील वाढत्या अत्याचारांकडे नांदेड पोलीस अधीक्षकांचे दुर्लक्ष का ?

## लोकस्वराज्य आंदोलनाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामचंद्र भरांडे यांचा सवाल

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** जिल्ह्यातील मातंग समाजातील नागरिकांवर विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणात अत्याचार झाल्याच्या घटना घडत असताना जिल्हा पोलीस अधिक्षक प्रमोद शेवाळे अशा गंभीर घटनांकडे कसे काय दुर्लक्ष करू शकतात? असा सवाल लोकस्वराज्य आंदोलनाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामचंद्र भरांडे यांनी केला आहे.

मौजे ढाकणी ता लोहा येथील कांबळे पती पत्नीवर गावातील व्यक्ती आपल्याकडे असलेल्या संपत्ती व राजकीय लागेबांधे च्या जोरावर मालकीचा प्लाट हाडप करतो, उलट जिवे मारण्याचा प्रयत्न करतो.ह्या सर्व घटनेची पुर्व पार्श्वभूमी माहीत असलेले सोनखेड पो स्टेशनचे पो निरीक्षक गुन्हा नोंदवण्यात जाणिवपूर्वक विलंब करतात कशासाठी..?

दुसरी घटना तेवढीच संवेदनशील आहे.ती अशी की, लोकस्वराज्य आंदोलनाचे मराठवाडा कोष्याध्यक्ष अर्जून गायकवाड यांच्या वर 295 हा धार्मिक विद्वेष पसरवल्याचा गुन्हा नोंदवला.कसलाही दोष नसताना अतिशय गंभीर स्वरूपाचा गुन्हा नोंदवला जात असेल तर प्रमुख म्हणून जिल्हा अधिक्षकांचे लक्ष कशात आहे..?

तिसरी घटना...वाघी ता. नांदेड येथील आहे.
अण्णा भाऊ साठे यांच्या जयंती स्थळ जागेवर झालेल्या अतिक्रमणाचा विषय आहे. गेल्या वर्षभरापासून वाघी येथील नागरिक महिला, पुरुष तरूण हे "आमच्या हक्काची जागा आम्हाला वापरण्यासाठी देण्यात यावी,यासाठी निवेदन, उपोषण, धरणे करीत आहेत.नांदेड तहसिलदार संबधीत जागे विषयी लोकप्रतिनिधी यांची मर्जी सांभाळत दोषींवर कारवाई करण्याचे टाळतात.त्याची परिणिती म्हणून या प्रकरणात सहभागी असलेल्या एक व्यक्तीचे अपहरण होते..अपहरण झालेल्या व्यक्तिची पत्नी व इतर महिला नागरिक नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसतात पोलिस अधिक्षक काहीच कारवाई करत असल्याचे दिसून येत नाही. असे का..?

चौथी घटना... दहिकळंबा ता कंधार येथील.
दुधकावडे नावाचा उच्चशिक्षित तरुण एका पायाने अपंग असलेला त्याच्या मालकीच्या जागेवर झेंडे रोवले जातात.बिडीओ, तहसिलदार, पोलीस अधिकारी बेकायदेशीरपणे केलेल्या कृत्यावर काहीच कार्यवाही करत नाहीत.हे आश्चर्यकारक आहे. सोनखेड, अर्धापूर, उस्माननगर,लिंबगाव येथील संबधीत पोलीस अधिकारी यांची पदाचा गैरवापर, आरोपींना मदत करणे,कारवाईस विलंब करणे,निष्पाप व्यक्तींवर गंभीर स्वरुपाचे खोटे गुन्हे नोंदविणे याविषयी कसून चौकशी करून कडक कार्यवाही करा. वरिल सर्व घटनांकडे तातडीने व जातीने लक्ष द्या. अन्यथा नाईलाजास्तव न्यायासाठी, पद व अधिकाराचा गैरवापर करणार्या पोलीस प्रशासनातील जातीयवादी कडक ारवाईसाठी मुंबई मंत्रालयासमोर मोठे आंदोलन करावे लागेल याची नोंद घ्यावी.



# भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या प्रदेशाध्याक्षपदी चव्हाण

## जिल्हाध्यक्षपदी दादासाहेब काळे; राष्ट्रीय अध्यक्षांच्या उपस्थितीत पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** मराठवाड्याच्या लातूर येथे अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती एवम ब्रीक्स मानव अधिकार मिशन च्या वतीने १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप खंडापूरकर बाबा यांच्या अध्यक्षतेखाली अरुणभाऊ चव्हाण यांची प्रभारी पदावरून महाराष्ट्र राज्याच्या प्रदेशाध्यक्षपदावर निवड केली. तर रिक्त पदी दादासाहेब काळे यांची जिल्हा अध्यक्ष पदी निवड करण्यात आली. यावेळी औरंगाबाद जिल्हयातील विविध पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी सोयगाव तालुका अध्यक्ष पदी गोकुळ सिंग राजपुत यांची सर्वानीमते निवड करण्यात आली. संमेलन सोहळ्याच्या व मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने मराठवाडा मुक्ती संग्रामात सहभागी महान स्वातंत्र्यसैनिकांचा सन्मान करून त्यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तर हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आले.



यावेळी सोयगाव,सिल्लोड व औरंगाबाद भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.दिनांक १८ सप्टेंबर रोजी आभ्यास शिबीर संपन्न झाले आसुन गेल्या वर्षभरात ज्यांनी संघटनेच्या बॅनर खाली कार्यक्रम घेतले आहेत आश्यांचा सन्मान करण्यात आला आसुन,महाराष्ट्र राज्याचे प्रदेशअध्यक्ष अरुणभाऊ चव्हाण अजिंठा, जिल्हा अध्यक्ष दादासाहेब काळे, जिल्हा शेख फेरोज भाई , जिल्हा सचिव सुनिल वैद्य , माहिला आघाडी औरंगाबाद जिल्हाध्यक्ष श्रीमती अंजनाताई राजपुत व सिल्लोड तालुका महिला आघाडी ता प्रमुख श्रीमती राधाबाई झलवार व सोयगाव तालुका अध्यक्षपदी गोकुळसिंग राजपूत या पदाधिकार्यांची निवड जाहीर करण्यात आले . यावेळी अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले . अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समितीचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष अरुणभाऊ चव्हाण,जिल्हा अध्यक्ष दादासाहेब काळे,जिल्हा सचिव सुनील वैद्य,जिल्हा उपध्याक्ष शेख फिरोज, अंजनाताई राजपूत महिला आघाडीचे औरंगाबाद अध्यक्ष, सिल्लोड ता उपाध्यक्ष राधाताई झेलवार या मान्यवरांचा सत्कार राष्ट्रीय अध्यक्ष खंडापूरकर बाबा यांच्या अध्यक्षतेखाली अॅड.राणीताई स्वामी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षा यांच्या हस्ते याचां शाल,श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी मा.आ.संजय बनसोडे माजी राज्यमंत्री व संपूर्ण महाराष्ट्रातील पुणे, औरंगाबाद, जालना, कोल्हापूर, जळगाव, हिंगोली अशे सर्व छत्तीश जिल्ह्यातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माळीवाडा येथे अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्यावर फुले उधळून आनंदोत्सव साजरा



आधुनिक केसरी न्यूज

**दौलताबाद :** लोकशाहिर अण्णा भाऊ साठे यांच्या जागतिक लेखनिच्या बळावर रशिया देशापर्यत पोहचनारे अण्णा भाऊ साठे यांच्या 14 सप्टेंबर रोजी राजधानी मास्को शहरात सरकारी वाचनलयात अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्याचे व तैल चित्राचे अणावर करण्यात आले. या ऐतिहासिक घटनेचा आनंद उत्सव साजरा करण्यासाठी माळीवाडा येथील लोकशाहिर आण्णाभाऊ साठे मित्र मंडळ व अनुलोम संस्था यांच्या संयुक्त विद्यामाने घेण्यात आलेला कार्यक्रमाची सुरुवात अण्णा भाऊ साठे पुतळ्यास प्रमुख पाहुने प्रा.डाँ. सुरेश चौथईवाले व उपसरपंच यांच्या हास्ते पुष्पहार घालुन अभिवादन करण्यात आले.
यावेळी प्रमुख पाहूने प्रा.डाँ. सुरेश चौथईवाले यांनी अण्णा भाऊ साठे यांचा जिवानावर मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थितानी आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यावर फुले उधाळून आनंद उत्सव साजरा केला. यावेळी प्रमुख पाहुने प्रा.डाँ. सुरेश चौथईवाले, अनमोल संस्था जिल्हा प्रमुख भाऊसाहेब मते, सरपंच अनिता हेकडे उपसरपंच कडू किर्तीकर,अनमोल भाग जनसेवक डाँ.मनोहर बन्सवाल, ग्रा.पं. सदस्य धम्मापाल गायकवाड, प्रविण बर्डे, कृष्णा मुळे,कमलबाई आस्वार ग्रामविकास अधिकारी हारदे सर, सुधारक हेकडे, मनोज बाचकर, अशोक आस्वार, एकनाथ सिरसाठ, गणेश अस्वार ,शिवाजी आस्वार, असाराम आस्वार, शंकर आस्वार, नंदकिशोर मुळे, शुभम खंडागळे, अतिष आस्वार, अमोल साठे, श्रीकांत खंडागळे, पप्पू आस्वार,राजू आस्वार, सोमनाथ आस्वार, आशाबाई अस्वार, दगडाबाई आस्वार,ताराबाई तुपे,सखुबाई आस्वार, अंगणवाडी कार्यकर्त्या यावेळी समाज बाधंवाची मोठ्या संख्येने उपस्थित होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन नंदकिशोर मुळे सर यानी केले. आभार प्रदर्शन गणेश आस्वार यानी केले.

## बंजारा महिलांकडून केंद्रीय मंत्री डॉ. कराड यांचे स्वागत



आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातीत सायगव्हान येथे विविध विकास कामाचे उद्‌घाटन निमित्ताने भर पावसात केन्द्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवतजी कराड यांची सभा झाली. या वेळी बंजारा महिलांनी डॉ. कराड यांचे स्वागत केले. याप्रंसगी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष संजय खंबायते, जिल्हा सचिव डॉ संजय गव्हाणे, महेश माळवतकर, तालुकाअध्यक्ष भगवान कोल्हे, जि. प सदस्य किशोर आबा पवार, काकासाहेब तायडे, उत्तमराव राठौड, सुभाष काळे, भगवान ठाकरे, समाधान पाटिल, देविदास राठौड, संरपच संजय चव्हाण, मनोज राठौड, रविन्द्र पवार, कुंजीलाल चव्हाण दिनेश राठौड इत्यादीची उपस्थीती होती.

## केसापुरी, रामपुरी ग्रा. पं.मध्ये मराठवाडा मुक्ती संग्रामदिन अमृत महोत्सव उत्साहात



आधुनिक केसरी

**दौलताबाद :** केसापुरी, रामपुरी ग्रामपंचायत येथे मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या अमृत महोत्सवी उत्साहात साजरा करण्यात आला. नवनियुक्त सरपंच ज्ञानेश्वर पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. केसापुरी ग्रामपंचायतचे सरपंच शांताराम वाहुळ यांचे पद रिक्त झाल्याने सरपंच पदाचे कामकाज हे उपसरपंच ज्ञानेश्वर पवार यांच्याकडे देण्याचे पं. स. चे गटविकास अधिकारी यांनी ग्रामसेवक यांना पत्र दिले आहे.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य कांतीलाल जाधव, धृपदाबाई राठोड, प्रतिभा साबळे, रुखमांबाई पवार, हिराबाई जाधव, बबाबाई जाधव, मुख्याध्यापक रवी जाधव, डॉ. कैलाश निकम, राजू गुंजाळ, भाऊसाहेब कळसकर, सुनील निकम, भगवान राठोड, रामा गुंजाळ, निवृत्ती गुंजाळ, साहेबराव मोरे, शिवाजी गुंजाळ, निवृत्ती गुंजाळ, गणेश सुराशे, कल्याण गायकवाड, दिलीप राठोड, रोहिदास पवार व ग्रामस्थ यांची प्रमुख उपस्थिती होती.

## शिवाजी दळवी यांची निवड

आधुनिक केसरी



**कन्नड :** तालुक्यातील हसनखेडा कविटखेडा ग्रामपंचायतच्या सर्वसाधारण सभेत एकमताने ठराव घेऊन शिवाजी दळवी यांची तंटामुक्त अध्यक्षपदी निवड करण्यात आली. देवगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अमोल मोरे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. याप्रसंगी सरपंच लीना राधेश्याम वैष्णव, उपसरपंच ज्ञानेश्वर दळवी व ग्रामसेवक आर डी बोरकर यांची उपस्थिती होती. या निवडीबद्दल सोसायटीचे चेअरमन पुंडलिक दळवी, योगेश पवार ,पोपटराव जाधव, अनिल शेळके, नारायण दळवी, उत्तमराव जाधव, दीपक दळवी, शब्बीर शहा, विक्रम पाटे यांनी अभिनंदन केले.

## सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

### हनिमून भाग - ०४

आधुनिक केसरी

* By inserting finger deeply intovagina (बोटाने)
* Masturbate with phallic vibrator or tools (व्हायब्रेटरच्या सहाय्याने)

**हायमेनचे महत्त्व काय ?**

विविध देशांत किंवा भारतात देखील आज सुद्धा हायमेन शाबूत असणे हे पवित्रतेचं लक्षण आणि पुरावा मानला जातो. हनिमूनच्या पहिल्या रात्री भिजलेली वेडशीट किंवा रुमाल हा अभिमानाने दाखविण्याची प्रथा देखील आपल्याकडे आहे.
युरोपियन देशांत किंवा अमेरिकन भागांमध्ये अशा गोष्टींना महत्त्व नाही. कारण तिथे लग्नाअगोदरच सेक्स केला जातो. आपल्याकडील या प्रवृत्तीमुळे मात्र अनेक मुलींसाठी हा एक तापदायक आणि चिंतेचा विषय बनला आहे.

**वस्तुस्थिती :** अनेक व्हर्जिन मुलींना हायमेन नसतेच आणि वस्तुस्थिती देखील आहे. त्यामुळे हायमेन नसणे किंवा असणे ही चाचणी होऊ शकत नाही. बऱ्याच वेळा अन्य कारणांमुळेही हे हायमेन ब्रेक होते.

* अपघात होणे, इजा होणे.
* घोड्यावर बसणे, सायकल चालवणे, उंच उडी मारणे, जिम करणे इ.
* डॉक्टर जेव्हा पेलव्हिक एक्झामिनेशन करतात तेव्हा हे हायमेन ब्रेक होते.
* रफ वॉशिंग
* ज्या स्त्रियांना पहिल्या रात्री हासमेन ब्रेक होऊन वेदना किंवा स्त्राव होईल

अशी भीती असते. त्यांनी ते तज्ज्ञ डॉक्टरकडून ब्रेक करुन घ्यावे.

**हायमिनोप्लास्टी**

काही गैरसमजुती व अंधश्रद्धा यामुळे अनेक मागासलेल्या जातींमध्ये रक्तस्त्राव झाला नाही तर अडचणी निर्माण होतात. अशा स्त्रियांना कठोर शिक्षा किंवा अगदी मृत्यूची शिक्षाही दिली जात असे. हे टाळण्यासाठी हायमेनोरोफी किंवा प्लास्टी केली जाते.

* यामध्ये फाटलेले हायमेन टाके देऊन बरे केले जाते.

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी अॅण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्काराने सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in